रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३८
www.ramprahar.com
शनिवार, २४ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

इमॅजिका वॉटर पार्कमधील कामगार महिलेचा विनयभंग/२
अलिबागमध्ये भाजपची कमळ दहीहंडी स्पर्धा/५
नीरज चोप्राने मोडला ऑलिम्पिक रेकॉर्ड/८

## बदलापूरच्या शाळेविरोधात 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल




**बदलापूर** : येथील नामांकित शाळेत झालेल्या दोन चिमुरड्या मुलींच्या लैंगिक शोषणप्रकरणी विशेष तपास समितीने (एसआयटी) शाळा प्रशासनाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोक्सो कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. बदलापूरमध्ये घडलेल्या घटनेनंतर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आता एसआयटीने शाळेवर गुन्हा दाखल केला आहे. एसआयटीने म्हटले आहे की, शाळा प्रशासनाने या प्रकरणाची माहिती मिळूनही पोलीस तक्रार केली नाही. पीडित मुलीच्या पालकांनी शाळेशी संपर्क केला होता. तरीही शाळेने योग्य पावले उचलली नाहीत. त्यामुळे पोक्सो कायद्याच्या २१व्या सूचीनुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महाराष्ट्र बंद मागे!

## मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर 'मविआ'ची माघार

**मुंबई : प्रतिनिधी**




महाविकास आघाडीने २४ ऑगस्ट महाराष्ट्र बंदची हाक दिली होती, मात्र अशा प्रकारे बंद घोषित करणे बेकायदा असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला. त्याचप्रमाणे उद्या कुणी अशा प्रकारे बंद पुकारल्यास त्यांच्यावर कारवाई करा, असे निर्देशही दिले होते. यानंतर महाविकास आघाडीने बंद मागे घेतला आहे.

राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचा निषेध नोंदवण्यासाठी महाविकास आघाडीने २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. महाविकास आघाडीच्या या बंदविरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर शुक्रवारी (दि. २३) तातडीची सुनावणी पार पडली. या वेळी न्यायालयाने अशा प्रकारे बंद घोषित करणे बेकायदा असून कोणत्याही पक्षाला बंद पुकारण्याचा अधिकार नाही, असा निर्णय दिला तसेच जर उद्या कुणी बंद पुकारतील त्यांच्यावर कारवाई करा, असे निर्देशही दिले.

दरम्यान, न्यायालयाच्या या निर्णयानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अशा बंदमुळे सर्वसामान्य माणूस भरडला जातो. त्यामुळे न्यायालयाने जो निर्णय दिला आहे त्याची अंमलबजावणी राज्य सरकार करेल, असे म्हटले होते.

सर्व परिस्थिती पाहता महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बंद मागे घेत असल्याचे जाहीर केले. त्यामुळे सामान्य जनतेने सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

## नेपाळमध्ये बस अपघातात महाराष्ट्रातील २४ जणांचा मृत्यू

**काठमांडू** : नेपाळमध्ये भाविकांना घेऊन जात असलेल्या बसला भीषण अपघात होऊन आतापर्यंत



२४ जणांचे मृतदेह सापडले आहेत. अपघातग्रस्त भाविक हे महाराष्ट्रातील जळगावचे असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील भाविक नेपाळमध्ये तीर्थयात्रेला गेले होते. हे प्रवासी जळगावमधील भुसावळ व आसपासच्या भागातील असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांची बस पोखरा येथून काठमांडूला जात असताना अपघातग्रस्त झाली आणि नदीत कोसळली. मुसळधार पावसामुळे नदीला पूर आलेला असल्याने अपघाताची तीव्रता वाढली. राज्य सरकारकडून या अपघातात जखमी झालेल्यांच्या मदतीसाठी आणि मृत्युमुखी पडलेल्यांचे मृतदेह परत आणण्यासाठी नेपाळच्या दुतावासाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# विकसकाला परस्पर जमीन देण्याचा ठराव रद्द करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची सिडकोकडे आग्रही मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऐरोली सेक्टर १० ए येथील मोक्याची ३० हेक्टर जमीन परस्पर विकसकाला देण्याबाबतचा प्रस्ताव सिडकोने तातडीने रद्द करावा, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना शुक्रवारी (दि. २३) सीबीडी बेलापूर येथील सिडको भवनात निवेदन दिले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत माजी खासदार डॉ. संजीव नाईक आणि आमदार महेश बालदी उपस्थित होते.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दै. लोकसत्ता वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार नवी मुंबईतील ऐरोली सेक्टर १० ए येथील ३० हेक्टर मोक्याचा भूखंड एका विकसकाला टाऊनशिप उभारणीकरिता परस्पर देण्याबाबत सिडकोमध्ये हालचाली चालू आहेत. या भूखंडाची किंमत जवळपास १० हजार कोटींपेक्षा जास्त असल्याचे समजते. त्याचबरोबर याबाबत सिडकोच्या संचालक मंडळाने मूळ प्रस्तावास संमती दिल्याबाबत माहिती मिळत आहे. याशिवाय खारघर येथील १०० एकरचा भूखंडदेखील परस्पर देण्याचा सिडकोचा विचार असल्याचेही कळत आहे. सिडकोच्या प्रचलित धोरणानुसार अथवा नियमानुसार भूखंडाचे वाटप न करता एवढ्या मोक्याचा, प्रचंड रकमेचा भूखंड परस्पर वाटप करणे हे अत्यंत चुकीचे व अयोग्य आहे आणि त्यामुळे सिडकोचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सिडको महामंडळ हे अत्यंत प्रतिथयश असे महामंडळ समजले जाते. त्यामुळे अशा निर्णयामुळे चुकीचा पायंडा पडण्याची शक्यता आहे. (पान २ वर..)

## गव्हाणमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्त एकवटले

# घरांवर कारवाईसाठी आलेले सिडको पथक नरमले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील गव्हाण गावात प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांवर कारवाई करण्यासाठी शुक्रवारी (दि. २३) आलेल्या सिडकोच्या पथकाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत विरोध करण्यात आला. प्रकल्पग्रस्तांचा आक्रमक पवित्रा पाहून सिडकोने आपली कारवाई थांबवली आणि जोपर्यंत गरजेपोटी बांधलेल्या घरांचा निर्णय होत नाही तोपर्यंत प्रकल्पग्रस्तांच्या कोणत्याही घराला हात लावणार नाही, अशी ग्वाही सिडको अधिकारी भरत ठाकूर यांनी दिली.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, सिडकोने दिलेल्या नोटीसांचे उत्तर प्रकल्पग्रस्तांनी दिले असतानाही ते कारवाई करण्यासाठी आले होते. सिडको प्रशासनाने प्रकल्पग्रस्तांनी दिलेले उत्तर समजून घ्यावे तसेच यापुढे गरजेपोटी बांधलेल्या घरांवर कारवाई करण्यापूर्वी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींसोबत बैठकीचे आयोजन करून या विषयावर चर्चा करावी, अशी सूचना सिडको अधिकाऱ्यांना केली. (पान २ वर..)

**सिडकोबाधित प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्या आहेत. त्या अद्यापही सिडकोने पूर्ण केल्या नाहीत. प्राधान्याने प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची सोडवणूक होणे गरजेचे असताना एखाद्या संस्थेला एवढ्या मोठ्या प्रमाणात भूखंड देणे अत्यंत चुकीचे आहे. त्यामुळे सिडकोने हा निर्णय रद्द करावा; अन्यथा संघर्षाचे पाऊल उचलावे लागेल.**
**–प्रशांत ठाकूर, आमदार**

**जवळपास २५ वर्षांचा कालावधी होऊनसुद्धा सिडकोने करंजाडे, द्रोणागिरी नोड येथील अद्यापपर्यंत जवळपास ४६१ प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंडाचे वाटप केले नाही. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्यासाठी भूखंड शिल्लक नसल्याचे कारण सिडको प्रशासन देत असते. असे असतानाही विकसकाला परस्पर मोक्याचा भूखंड देण्याचा घाट घालण्यात येत आहे. तसे न करता प्रकल्पग्रस्तांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी सिडकोने प्राथमिकता द्यावी.**
**–महेश बालदी, आमदार**

## मुरुड खोकरी येथे एसटी बसला अपघात; १५ विद्यार्थी जखमी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील खोकरी येथे एसटी बसला अपघात होऊन १५ शालेय विद्यार्थी जखमी झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २३) सकाळी घडली. यापैकी ११ जखमींना मुरुड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून चार विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले, तर किरकोळ जखमी विद्यार्थ्यांना घरी सोडून देण्यात आले आहे.

मुरुड एसटी आगाराची आगरदांड्याला गेलेली बस (एमएच १४–बीटी १५९२) परत येत असताना खोकरी येथील एका अवघड वळणावर समोरून वेगाने येणाऱ्या कारला साईड देण्यासाठी बसचालकाने तातडीने ब्रेक दाबला. त्यामुळे बस साईडपट्टीवरून घसरून बाजूच्या कठड्यावर आदळून झाडाला अडकली. या बसमधून



आगरदांडा येथे राहणारे व अंजुमन इस्लाम हायस्कूल व डिग्री कॉलेजमध्ये शिकणारे १५ विद्यार्थी प्रवास करत होते.

सर्व जखमी विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. यापैकी चार विद्यार्थी किरकोळ जखमी असल्याने त्यांना घरी पाठवण्यात आले. इब्राहिम सवाईल (इयत्ता सातवी), आयेशा कादरी (तेरावी), नबा गझगे (बारावी) व सामिया सवाई (अकरावी) या चार विद्यार्थ्यांच्या डोक्याला मार लागला असल्याने अलिबाग जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले आहे. (पान २ वर..)

# अलिबागमधील अनधिकृत कॉल सेंटरचा पर्दाफाश

## ३२ पुरुषांसह एका महिला आरोपीला अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील परहूरमधील नेचर एज रिसॉर्टमध्ये बेकायदेशीरपणे चालवण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय कॉल सेंटरचा अलिबाग पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. अमेरिकेत प्रतिबंधित कामोत्येजक गोळ्या विकण्याच्या बहाण्याने फसवणूक करण्याचा उद्योग या कॉल सेंटरच्या माध्यमातून सुरू होता. या प्रकरणी ३३ जणांना अटक करण्यात आली. यात एका महिलेचा समावेश असून हे सर्व आरोपी परराज्यातील आहेत. रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शुक्रवारी (दि. २३) ही माहिती दिली.

इंटरनेट लिंक आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून हे कॉल सेंटर चालवले जात होते, ज्यात आरोपी इंटरनेटच्या सहाय्याने कॉल आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून



अमेरिकेतील नागरिकांशी संपर्क साधत होते. यु.एस. फार्मा या अमेरिकन कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवून त्यांना कामोत्येजक गोळ्या घरपोच देण्याचे आमिष दाखवत होते. व्हियाग्रा, सियालिस, लिविट्रो या वितरणाची हमी या कॉल सेंटरच्या माध्यमातून ग्राहकांना दिली जायची. नंतर मात्र प्रतिबंधित गोळ्यांचे वितरण न करता त्यांची फसवणूक केली जात असे.

या गोळ्यांच्या खरेदीसाठी गिफ्ट कार्डचा वापर करावा, असे सांगून ग्राहकांना गिफ्ट कार्डखरेदी करण्यास भाग पाडत असे. गिफ्ट कार्डच्या माध्यमातून जमा झालेले पैसे हवालामार्फत भारतात आणले जात होते. (पान २ वर..)

## महाराष्ट्रातील राज्यसभेच्या दोन्ही जागा महायुतीकडे

### भाजपचे धैर्यशील पाटील, राष्ट्रवादीचे नितीन पाटील यांची बिनविरोध निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभेवर महाराष्ट्रातून निवडून द्यायच्या दोन जागांवर भाजपचे धैर्यशील पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नितीन पाटील आणि यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडणुकीसाठी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याव्यतिरिक्त अन्य दोन अपक्ष उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. अपक्षांचे अर्ज बाद झाल्याने धैर्यशील पाटील आणि नितीन पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे.

राज्यसभेच्या दोन जागांसाठीच्या निवडणुकीला





भाजपकडून दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष व पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांना तिकीट देण्यात आले होते, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सातारा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष व वाईचे आमदार मकरंद पाटील यांचे बंधू नितीन पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यांना राज्यसभेवर नियुक्त झाल्याचे प्रमाणपत्र सोमवारी देण्यात येईल.

# जैव वैद्यकीय कचऱ्याबाबत पनवेल मनपा मुख्यालयात बैठक

## ▪ जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांची सूचना



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व खासगी रुग्णालये, दवाखाने, पॅथोलॉजी लॅब, डे केअर सेंटर येथील जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता मुंबई वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिस, लि., तळोजा या कंपनीचे वाढीव दर कमी करणे व इतर तक्रारींचे निवारण करण्याबाबत रायगड मेडिकल असोसिएशनच्या सदस्यांची गुरुवारी (दि. २२) महापालिकेच्या मुख्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

या बैठकीस माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी, महापालिका कार्यक्षेत्रातील वैद्यकीय क्षेत्रातील विविध संघटनांचे प्रतिनिधी, मुंबई वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिस, लि., तळोजाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते. (पान २ वर..)



**मुंबई : नवभारत हेल्थकेअर पुरस्कार सोहळा नुकताच ताज प्रेसिडन्सी येथे झाला. या सोहळ्यात पनवेल येथील प्राचीन हेल्थकेअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. मंगेश डाके यांना आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्याचे माजी आरोग्यमंत्री दीपक सावंत यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. डाके यांनी त्यांच्या पत्नी संगीता डाके यांच्यासमवेत हा पुरस्कार स्वीकारला.**
ADVT.




**'रामप्रहर'मध्ये वाचा**
**नवे सदर संवादप्रहर...**

विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेले अधिकारी, पदाधिकारी आणि इतर क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती 'रामप्रहर'च्या संवादप्रहर सदरामध्ये दर शनिवारी प्रसिद्ध करण्यात येत आहे. आज आपल्या भेटीला आल्या आहेत...

**भारत विकास परिषदेच्या पनवेल शाखा अध्यक्ष डॉ. किर्ती समुद्र/पान ६**



# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेला उत्तम प्रतिसाद

## कोकण विभागात पाच हजार ३८४ उमेदवारांची निवड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत कोकण विभागात शासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षणासाठी आत्तापर्यंत एकूण पाच हजार ३८४ उमेदवारांची निवड करण्यात आली असून त्यापैकी आतापर्यंत एकूण चार हजार ७६ उमेदवार शासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागीय आयुक्तालय मुंबई विभागाचे उपायुक्त दिलीप पवार यांनी दिली आहे.

राज्यभर यशस्वी झालेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा प्रत्यक्ष लाभ राज्यातील माता, भगिनी, मुलींच्या खात्यात जमा झाल्यानंतर लाडक्या भावांचे काय? असा प्रश्न जनसामान्यांमधून विचारण्यात येत होता. म्हणून लाडक्या बहिणीबरोबर लाडक्या भावालाही आर्थिक पाठबळ मिळावे अशा उद्देशाने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नावीन्यता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेंतर्गत आतापर्यंत शासकीय आणि खासगी आस्थापनांवर ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने एकूण २२ हजार ७६७ उमेदवारांनी नोंदणी केली असून त्यापैकी शासकीय आस्थापनांवर ऑनलाईन पद्धतीने ७२५ व ऑफलाइन पद्धतीने दोन हजार ३४५ तर खासगी आस्थापनांवर ऑनलाईन पद्धतीने ६६० तर ऑफलाईन पद्धतीने ३४९ असे एकूण चार हजार ७६ उमेदवार प्रत्यक्षरित्या प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत.

सर्वप्रथम शासकीय आस्थापना आणि खासगी उद्योजकांची नोंदणी करुन घेण्यात आली आहे. यामध्ये ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने नोंदणी करण्यात आली असून कोकण विभागातील मुंबई शहरांतर्गत येणाऱ्या शासकीय आणि खासगी अशा १०४ आस्थापना, उद्योजकांनी, मुंबई उपनगरमधील ९०, ठाणे ६००, पालघर ६२४, रायगड १०४, रत्नागिरी १८५, सिंधुदूर्ग ४९४ अशा एकूण दोन हजार २०१ शासकीय आणि खासगी आस्थापना, उद्योजकांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने नोंदणी केली आहे. या नोंदणी झालेल्या शासकीय आस्थापनांमध्ये एकूण ८२ हजार ९३१ रिक्त पदे आहेत तर खासगी आस्थापनांमध्ये एकूण १० हजार १८९ पदे रिक्त आहेत. त्यापैकी मुंबई शहर जिल्ह्यात शासकीय ५१ हजार ४३५ खासगी ४४० एकूण ५२ हजार नऊ, मुंबई उपनगर जिल्हयात शासकीय ४६७ खासगी दोन हजार ३७८ एकूण तीन हजार १३७, ठाणे जिल्ह्यात शासकीय पाच हजार १३७ खासगी दोन हजार ७१७ एकूण आठ हजार ८०५, पालघर जिल्ह्यात शासकीय तीन हजार १११ खासगी दोन हजार ८८ एकूण पाच हजार ५४०, रायगड जिल्ह्यात शासकीय सहा हजार १०२ खासगी एक हजार ८५५ एकूण सात हजार ९५७, रत्नागिरी जिल्ह्यात शासकीय ६२६ खासगी ३८८ एकूण तीन हजार ३७५, सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासकीय एक हजार ७८५ खासगी ३२३ एकूण दोन हजार १०८ अशाप्रकारे रिक्त पदांची ऑनलाइन आणि ऑफलाईन पद्धतीने नोंदणी झाली आहे.

मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत अजूनही कोकण विभागातील काही जिल्ह्यांमध्ये उमेदवारांच्या नोंदणीचे काम सुरू आहे. याबद्दल अधिकाधिक जनजागृती व्हावी प्रसिद्धी व्हावी यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. ही योजना शहरापासून गावपातळीपर्यंत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचावी गावखेड्यांमधील मुलामुलींना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. या योजनेच्या जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागीय आयुक्तालय मुंबई विभागाचे उपायुक्त दिलीप पवार यांनी केले आहे.

## इमॅजिका वॉटर पार्कमधील कामगार महिलेचा विनयभंग

### खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील महिला कामगारांचा विनयभंग करण्याची १५ दिवसांत तिसरी घटना घडली असून इमॅजिका वॉटर पार्क येथील महिला कामगाराला अश्लिल व्हिडिओ दाखवून तिच्याकडे शरीरसुखाची मागणी करणाऱ्या सचिन मदन पाटीलविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

२४ वर्षीय पीडित महिला मूळ मुंबई येथे राहणारी असून इमॅजिका वॉटर पार्क येथे कामाला आहे. सचिन पाटीलदेखील तिच्यासोबत कामाला असून त्याने पीडितेशी जवळीक अश्लिल व्हिडिओ दाखविला होता, तसेच पीडितेला, 'तुला पैसे देतो तू रूमवर चल' असे बोलला. पीडितेने नकार दिल्यावर सचिन याने तिचा उजवा हात मनगटात पकडून पिळला. त्यांच्या मनात लज्जा उत्त्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला. दबावाखाली असलेल्या पीडितेने हा प्रकार तिच्या पतीला सांगितल्यानंतर सचिन पाटीलविरोधात खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई सरिता मनवर करीत आहेत.

याआधीही एका हॉटेलवर महिला कामगारावर अत्याचाराचा प्रयत्न टँकरवरील क्लिनरने केला होता. त्यानंतर तांबाटी येथील महिला कामगाराचा विनयभंग गावातील इसमाने केला होता. ही घटना ताजी असतानाच इमॅजिका वॉटर पार्कमधील महिला कामगारांचा विनयभंग झाल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## मोफत विजेचा फायदा शेतकऱ्यांनाच –विश्वास पाठक



**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज देण्याचा महायुती सरकारचा निर्णय ऐतिहासिक आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांनाच लाभ होणार असून समाजवादी पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रताप होगाडे यांची केवळ महावितरणचाच फायदा होणार असल्याची तक्रार दिशाभूल करणारी आहे. होगाडे यांच्याकडून शेतकऱ्यांच्या फायद्याच्या योजनेला रेवडी म्हणणे हा शेतकऱ्यांचा अपमान आहे, अशी टीका महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी केली.

विश्वास पाठक म्हणाले की, प्रताप होगाडे हे स्वतःला वीजग्राहक संघटनेचे अध्यक्ष म्हणवत असले तरी शेतकऱ्यांच्या फायद्याच्या योजनेच्या बाबतीत मात्र ते केवळ समाजवादी पार्टीच्या कार्याध्यक्षपदाच्या भूमिकेतूनच टीका करीत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सरकारने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे कृषीपंपांचे वीजबिल सरकार भरणार आहे. त्यासाठी सरकारने १४,७६० कोटी रुपये तरतूद केली आहे. सरकारने ही योजना पाच वर्षे चालेल असे शासन निर्णयात स्पष्ट केले असूनही होगाडे यांनी त्याला निवडणूक जुमला म्हणणे चुकीचे आहे. त्यांनी या योजनेचे वर्णन रेवडी असे केले असून हा तर लाभार्थी शेतकऱ्यांचा अपमान आहे.

त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन व महावितरणच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौरकृषीवाहिनी योजना २.० ही योजना राबविण्यात येत आहे. याच्या अंतर्गत नऊ हजार मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यात येत आहेत. यातून निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी होणार आहे तसेच यामध्ये सुमारे तीन रुपये प्रतियुनिट दराने वीज मिळणार आहे. काही महिन्यातच टप्प्याटप्प्याने या प्रकल्पातून वीजनिर्मिती सुरू होत असून त्यामुळे शेतकऱ्यांसाठीच्या वीज खरेदीचा खर्च व परिणामी सबसिडीची गरज खूप कमी होणार आहे. महायुती सरकारने बळीराजा मोफत वीज योजना सुरू करताना पूर्ण नियोजन केलेले आहे. त्यामुळे ही योजना टिकाऊ आणि शेतकऱ्यांना उपयुक्त ठरणार आहे.

## बालकांवरील लैंगिक अत्याचारासंदर्भात रयत शिक्षण संस्थेत शिक्षकांशी चर्चा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

येथील रयत शिक्षण संस्थेचे विद्यामंदिर पोलादपूर येथे सुरक्षित शाळा अभियान मोहीम २०२४ अनुषंगाने पोक्सो कायद्यातील तरतुदी, चारित्र्य पडताळणीबाबत महत्त्वाचे मुद्दे याबाबत तालुक्यातील सर्व खासगी स्वयंचलित, रायगड जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापकांची बैठक घेण्यात आली. या वेळी तहसीलदार कपिल घोरपडे यांनी राज्यातील बालकांवरील अत्याचारांच्या घटनांच्या संदर्भातून कायदेविषयक माहिती दिली.

या बैठकीमध्ये विद्यार्थी हे खासगी वाहनाने प्रवास करणार नाहीत याची दक्षता घ्यावी, मुलींच्या सुरक्षिततेसाठी शासनाच्या परिपत्रकानुसार उपाययोजना कराव्यात, मुलींकडे महिला शिक्षकांनी नियमितपणे त्यांना कोणी त्रास देतोय का, कोण तुमचा पाठलाग करतोय का याची विचारणा करावी, शाळेच्या आवारात सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, मुलांच्या स्वच्छतागृह नियमित चेक करावेत व ते स्वच्छ राहतील याची काळजी घेऊन ते सुरक्षित आहेत याची दक्षता घ्यावी, मुलांना घेऊन येणारे वाहनचालकांची संपूर्ण माहिती घेणे व त्यांना मुलांच्या सुरक्षाविषयक सूचना वेळोवेळी करणे, तसेच पहिली ते चौथी इयत्तेच्या विद्यार्थी यांच्यासोबत मैत्रीपूर्ण प्रश्नोतरी स्वरूपात गप्पा मारून गुड टच बॅड टच, अनोळखी व्यक्तीकडून चॉकलेट घेऊ नये, त्यांचेसोबत कोठेही जाऊ येऊ नये, नेहमी आई, वडील, दादा, ताई यांच्यासोबतच शाळेत यावे व जावे अशा सूचना दिल्या.

या कार्यक्रमास गटविकास अधिकारी दिप्ती घाट, गटशिक्षणाधिकारी शिंदे तसेच दामिनी पथकाकडील महिला पोलीस अंमलदार व स्टाफ हजर होते.



**पान १ वरुन**

### विकसकाला परस्पर जमीन देण्याचा ठराव रद्द करा

प्रचलित नियमांनुसार भूखंड लिलाव अथवा टेंडर पद्धतीने विकल्यास सिडकोस हजारो कोटी रुपये मिळून त्याचा विनियोग हा विकासकामांकरिता करता येईल. पूर्वीसुद्धा असा एक परस्पर भूखंड देण्याचा निर्णय सिडकोच्या अंगलट आला होता व तो निर्णय सिडकोला रद्द करायला लागला होता. सिडकोच्या स्थापनेनंतर इतक्या वर्षानंतरसुद्धा पनवेल व उरण तालुक्यातील अनेक प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या हक्काच्या १२.५ टक्के भूखंडाचे वाटप झालेले नाही. त्याकरिता जागा उपलब्ध नसल्याचे कारण सिडकोतर्फे देण्यात येते. असे असताना जर असे मोक्याचे व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे भूखंड सिडकोतर्फे एखाद्या विकसकाला परस्पर देण्यात येत असेल तर ते अत्यंत चुकीचे आहे. यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये संभ्रमाचे तसेच संतापाचे वातावरण आहे. अशा वेळी सिडको प्रशासनाने पुढाकार घेऊन हा संभ्रम दूर करणे गरजेचे आहे, असे नमूद करतानाच सिडको प्रशासनाने हा प्रस्ताव तातडीने रद्द करावा व सिडकोअंतर्गत सर्व भूखंडाचे वाटप हे प्रचलित धोरणानुसार व नियमानुसारच करण्यात यावे, अशी सूचनावजा मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

### गव्हाणमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्त एकवटले

सिडकोला विरोध दर्शवताना भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भगत, विधानसभा निरीक्षक रूपेश पाटील, माजी पं.स. सदस्य भाऊशेठ पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, व्हावे ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर, सी.एल. ठाकूर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, वामनशेठ म्हात्रे, कामगार नेते रवी नाईक, उलवे नोड १ अध्यक्ष निलेश खारकर, उद्योजक मनोज आंग्रे, सदानंद देशमुख, शैलेश भगत, सुहास भगत, कमळाकर देशमुख, योगिता भगत, निकिता खारकर, धीरज ओवळेकर, विनायक कोळी, किरण देशमुख, पी.ए. कोळी यांच्यासह सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते, प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.

### मुरूड खोकरी येथे एसटी बसला अपघात; १५ विद्यार्थी जखमी

उर्वरित रफजा सोंडे, अर्श गझगे, रजीन सोंडे (चौदावी), आयेशा कादिरी (तेरावी), नबा गझगे (बारावी), हानिया अन्वारे, जैनब खतीब, सानिया खतीब व सायमा कादरी (अकरावी) यांच्यावर मुरूड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक उदय झावरे, सहाय्यक हवालदार दीपक राऊळ आदींसह कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अंजुमन इस्लाम हायस्कूलचे प्राचार्य जाहिद गोठेकर, चेअरमन रहिम कबले, डिग्री कॉलजेचे प्राचार्य डॉ. साजिद शेख, नायब तहसीलदार संजय तवर, ऋषिकांत डोंगरीकर, आगरदांडाचे सरपंच आशिष हेदुळकर श्रीकांत सुर्वे, कुणाल सतविडकर, आंबोली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सादिक कबले आदींनी जखमी विद्यार्थ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. या घटनेची नोंद मुरूड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अलिबागमधील अनधिकृत कॉल सेंटरचा पर्दाफाश

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी ३३ जणांना अटक केली आहे. ३१ संगणक, ५५ मोबाईल फोन, पाच वाहनांसह एकूण ८५ लाख ४५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या सर्वांचा मास्टर माइंड रोहित बुटाणे याचा पोलीस शोध घेत आहेत. पुढील तपास अलिबाग पोलीस करत आहेत, असे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

आवासमधून दोघांना अटक

अलिबाग तालुक्यातील आवास येथेदेखील अशा प्रकारचे कॉल सेंटर चालवले जात होते, अशी माहिती परहूर येथे अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून मिळाली. त्यानुसार पोलिसांनी आवास येथे छापा टाकला आणि तेथून दोन जणांना अटक केली. इतर आरोपी पसार झाले, अशी माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

### जैव वैद्यकीय कचऱ्याबाबत पनवेल मनपा मुख्यालयात बैठक

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिकेस जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जैव वैद्यकीय कचरा अधिनियम २०१६ अंतर्गत जिल्हास्तरीय गठीत असलेल्या समितीस बैठक घेण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन पत्र देण्याबाबत सूचित केले.

आयुक्त मंगेश चितळे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जैव वैद्यकीय कचऱ्याबाबतचे शासन निर्णय व नियमावली देण्याबाबत सूचित केले तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित असलेल्या समितीची सचिव या नात्याने लवकरात लवकर बैठक आयोजित करण्याबाबत सूचित केले.

पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व खासगी रुग्णालये, दवाखाने, पॅथोलॉजी लॅब, डे केअर सेंटर येथे जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता मुंबई वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिस, लि., तळोजा या खासगी कंपनीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे प्राधिकृत केले आहे, परंतु जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता महापालिका कार्यक्षेत्रात ही एकमेव कंपनी असल्याकारणाने कंपनीचा कारभार मनमानी पद्धतीने चालू आहे, असे खासगी रुग्णालये, दवाखाने, पॅथोलॉजी लॅब डे केअर सेंटर यांचे म्हणणे आहे. जैव वैद्यकीय कचऱ्याची योग्य व वेळेत विल्हेवाट लावणे परिसराच्या, आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने रायगड मेडिकल असोसिएशनने पत्राद्वारे आमदारमहोदय यांच्या प्रमुख उपस्थितीत व आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली खासगी रुग्णालय प्रतिनिधी व मुंबई वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिस, लि., तळोजा यांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची एकत्रित बैठक आयोजित करण्याबाबत मागणी केली होती. त्यानुसार ही बैठक झाली.

या वेळी चर्चेदरम्यान ठाणे महापालिकेच्या दरांप्रमाणे पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व खासगी रुग्णालये, दवाखाने, पॅथोलॉजी लॅब, डे केअर सेंटर्सना मुंबई वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिस, लि. कंपनीने दर आकारण्याबाबत स्वीकृती दर्शविली.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी राज्यात दोन लाखांपेक्षा जास्त पात्र

**मुंबई : प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना मदतीचा हात म्हणून एकवेळ एकरकमी रुपये तीन हजार त्यांच्या खात्यात थेट वितरण करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी राज्यात दोन लाख १४ हजार ९७८ अर्ज पात्र झाले आहेत.

राज्यात मुंबई विभागात २९ हजार ९९, नाशिक विभागात २७ हजार ५४, पुणे विभागात ७४ हजार ६७१, अमरावती विभागात १० हजार १७९ नागपूर विभागात, ४५ हजार ७०२, छत्रपती संभाजीनगर विभागात सहा हजार २५७, लातूर विभागात २२ हजार १६ अर्ज पात्र झाले आहेत. सर्वात जास्त पात्र अर्ज कोल्हापूर जिल्ह्यात ५७ हजार ३९९ झाले आहेत. अतिदुर्गम गडचिरोली जिल्ह्यातही २४ हजार ९९८ अर्ज पात्र झाले आहेत.

ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणे करिता तसेच त्यांचे मन:स्वास्थ्य केंद्र, योगोउपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणाकरिता या योजनेच्या माध्यमातून तीन हजार रुपये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे त्यांना मिळणार आहे.

पात्र ज्येष्ठ लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता आणि दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने उपकरणे खरेदी करता येतील, त्यामध्ये चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड ,स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी-ब्रेक्स, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर यांचा समावेश असून राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योग उपचार केंद्र मनस्वास्थ्य केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्र येथे त्यांना सहभागी होता येणार आहे.

## कामोठे येथील रस्त्यांच्या दुरूस्तीचे काम तातडीने करा

### अरुणकुमार भगत यांची मागणी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील रस्त्यांच्या निकृष्ठ दर्जाच्या दुरूस्ती कामाबाबत माजी नगरसेवक डॉ.अरुणकुमार भगत यांनी रस्ते दुरूस्तीची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पनवेल मनपा आयुक्तांना निवेदन दिले आहे.

डॉ. भगत यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे शहर परिसरातील अनेक रस्ते खुप खराब झालेले असून सदरील रस्त्यांवर मोठे खड्डे पडले असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे सदरील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने सदरील रस्त्यांवरील खड्डे पूर्णपणे बुजवणे आवश्यक आहे तसेच अगामी महिन्यात गणेशोत्सव असल्याने यामुळे नागरिकांची अधिकची गैरसोय होऊ नये याकरीता तातडीने हे रस्ते दुरूस्तीची काम सुरू होणे आवश्यक आहे.

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील रस्त्यांचे दुरूस्ती काम तातडीने सुरू करून या परिसरातील नागरिकांना उपकृत करावे, असे निवेदनात नमूद केले आहे.

## निवडक

### गटारात पडून एकाचा मृत्यू

**पनवेल :** नवीन पनवेल, सेक्टर ९ येथील गटारामध्ये ४५ ते ५० वर्षीय व्यक्ती पडल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. निमिषा अपार्टमेंट, प्लॉट नंबर १२-१३ रोड नंबर दोन, सेक्टर नऊ, नवीन पनवेलच्या पाठीमागील बाजूस असलेल्या गटारात या व्यक्तीचा मृतदेह सापडून आला. त्याची उंची पाच फूट, डोक्याला टक्कल पडलेले आहे. त्याचा चेहरा गोल असून उजव्या हातावर राजयोग व त्याच्याखाली गाजा असे गोंदलेले आहे. छातीवर उजव्या बाजूला बदामामध्ये मा आणि डाव्या बाजूस शेर असे गोंदलेले आहे. तो अंगाने मध्यम असून अंगात निळा शर्ट व काळी ट्रॅक पॅन्ट व निळी हाफ पॅन्ट घातली आहे.

### सुकापूर येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** विमलवाडी, बालाजी सिम्फनी जवळ, सुकापुर येथे राहणारी महिला कामावर जाते असे सांगून घरातून निघून गेलेली २८ वर्षीय दीपिकादेवी मनोज कुमार शर्मा ही घरी परत न आल्याने ती हरवली असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिची उंची पाच फूट, रंग गोरा, केस काळे, मध्यम आहेत. तिच्या कपाळावर जुन्या जखमेची निशाण असून तिने अंगात पंजाबी ड्रेस परिधान केला आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार नवनाथ नरळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नेवाळीमध्ये पाण्याची टाकी, विद्युत डीपीचे लोकार्पण

# भाजप समाजसेवेच्या भावनेतून सुविधा देतो

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजसेवेच्या भावनेतुन आणि ग्रामस्थांना सुविधा देण्यासाठी भारतीय जनता पक्ष काम करते, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेवाळी गावामध्ये पाण्याच्या टाकीचे आणि विद्युत डीपीच्या लोकार्पणावेळी केले.

गेल्या अनेक वर्षांपासून नेवाळी गावातील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत होता. हा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने सुटला असून या गावात हाराष्ट्र जीवन प्राधिकारणाची जल वाहिनी जोडण्यात आली आहे. तसेच पाणी पुरवठाही सुरू करण्यात झाला आहे. हे काम मार्गी लावण्यासाठी मोतीराम काथारा, नामदेव पाटील, आकाश काथारा, देवराम काथारा, राजेश काथारा यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच पाण्याच्या कनेक्शनसाठी मोतीराम काथारा यांनी दोन लाख १७ हजार, नामदेवा काथारा यांनी ५० हजार तर भैरवनाथ सोसायटीच्यावतीने ३० हजार रुपयांची आर्थिक मदत केली आहे. दरम्यान, एमजेपीच्या वतीने दिवसाला दोन लाख ७५ हजार लिटर पाणीपुरवठा होणार आहे. या पाण्याच्या टाकीचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. पाण्याच्या प्रश्नासह आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेवाळी गावातील विजेचा प्रश्नही मार्गी लवाला आहे. नेवाली गावात स्वतंत्र विद्युत डीपी नसल्यामुळे ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते.

या संदर्भात त्यांनी महावितरणकडे स्वतंत्र डीपी उपलब्ध करून देण्याची मागणी केली, मात्र महावितरणाकडे निधी नसल्याचे त्यांनी सांगितले. याबाबात आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे नेवाळी ग्रामस्थांनी माहिती दिली असता आमदारांनी त्वरित जिल्हा वार्षिक नियोजन निधीमधून डीपीसाठी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. त्यानुसार या डीपी बसवण्याच्या काम करण्यात आले होते. हे काम पूर्ण झाले असून या डिपीचेही लोकर्पाण या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमावेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस भुपेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे, मोतीराम काथारा, राजेश काथारा, महादू शेळके, जगदीश शेळके, विश्वास काथारा, आकाश काथारा, शुभ पाटील, सुगंधा काथारा, प्रमोद खांदेकर, ज्ञानदेव पाटील, देवराम काथारा, विठ्ठल काथारा, महेंद्र काथारा, प्रदीप पाटील, बाबा म्हस्के, मारुती शिंदे यांच्यासह भैरवनाथ आणि मुक्तेश्वर सोसायटीचे रहिवासी, भाजपचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# न्हावे येथील शेकाप, ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे सबका साथ सबका विकास ही विचारसणी तसेच पक्षाच्या सक्षम नेतृत्वाखाली होत असलेल्या विकासाच्या कामांवर प्रभावीत होऊन न्हावे गावातील शेतकरी कामगार पक्ष आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यक्रत्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये शुक्रवारी (दि. २३) जाहीर पक्ष प्रवेश केला. या प्रवेश कर्त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पक्षात स्वागत करून स्मशानभुमीतील कामांसाठी १६ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या न्हावे येथील निवासस्थानी झालेल्या या पक्षाप्रवेशावेळी शिवसेना आणि शेकापमधून गौरव भोईर, राजेश म्हात्रे, उमेश पाटील, केतन म्हात्रे, करसन ठाकूर, विष्णु म्हात्रे, कुंदन भोईर, अनिकेत भोई, हेमंत भोईर, चंद्रकांत पाटील, हमकेश भोईर यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या वेळी न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, चंद्रकांत भोईर, किशोर घरत, तुषार भोईर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर, प्रकाश कडू, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सुहास भगत, सुनिता भोईर, रंजना पाटील, मीनाक्षी पाटील, जागृती म्हात्रे, ललिता भोईर, नरेश मोकल, सुनील कोळी, राजकारण कोळी, विनायक कोळी, निलेश खारकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपला एक लोक प्रतिनिधी या नात्याने, या केंद्राच्या उभारणीसाठी माझ्यावर जी काही जबाबदारी द्याल ती आनंदाने मी स्वीकारेन, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे भूमिपूजन दिली.

श्री स्वामी समर्थ महाराज आणि परमपूज्य गुरुमाउली यांच्या आशीर्वादाने श्री स्वामी सेवा केंद्र कामोठे येथील सेक्टर ३४ येथे नव्याने श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र उभारण्यात येणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नव्याने उभारण्यात येणाऱ्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे भूमिपूजन झाले. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र उभारणीसाठी माजी नगरसेवक विकास घरत आणि सुशील शर्मा यांनी आर्थिक मदत केली आहे.

या कार्यक्रमावेळी शिवसेना पनवेल जिल्हा प्रमुख प्रमुख शेवाळे, भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, विजय चिपळेकर, सुशील शर्मा, दामोदर चव्हाण, शिक्षक सेलचे अध्यक्ष मनोहर शिंगाडे, कामोठे मंडळ सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, अशोक मोटे, विद्या तामखेडे, नाना मगदूम, हरजिंदर कौर, स्वामी समर्थ केंद्राचे मुख्य सेवेकरी राजेंद्र बोबडे आदी उपस्थित होते.

# खारकोपरमध्ये महिलांना साडीवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यात महायुती सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेत नोंदणी करणाऱ्या सर्व बहिणींसाठी उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांच्याकडून रक्षाबंधन म्हणून खारकोपर विभागातील महिलांना साडी वाटप करण्यात आले.

या वेळी गव्हाण ग्रामपंचायत सदस्य सुनीता गजानन घरत, उलवे नोड उपाध्यक्ष सुजाता राजेश पाटील, शुभांगी महेंद्र पाटील, ज्योती दिनेश पाटील, प्रज्ञा कैलास पाटील, मनिषा प्रभाकर पाटील, रजिया शादीक शेख, कल्याणी जयेश घरत, श्वेता उत्तम घरत व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहकार्य करून साड्यांचे वाटप महिलांना केले. त्या वेळी सर्व साडी घेणाऱ्या महिलांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानले.





**पनवेल :** बासू आदक आणि सोपा आदक यांनी कापड बाजारात सुरू केलेल्या पूनम ज्वेलर्सचे उद्घाटन माजी नगरसेवक राजू सोनी आणि माजी नगरसेविका नीता माळी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजपचे शहर भटके विमुक्त अध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, शहर महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा नीता मंजुळे, तपसू खान आदी उपस्थित होते.



**पनवेल : ब्रम्हकुमारीजतर्फे रक्षाबंधनाचा कार्यक्रम झाला. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर तसेच तारादीदी, ॲड. शुभांगी झेमसे आदींची उपस्थिती लाभली.**

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे अनोखे रक्षाबंधन

## कैद्यांना राखी बांधून लायब्ररीसाठी पुस्तके भेट





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजसेवी उपक्रमात अग्रगण्य असलेली इनरव्हील क्लब ऑफ पनवेल या संस्थेतर्फे सोमवारी (दि. १९) पनवेलजवळील तळोजा कारागृहात तेथील कैद्यांना इनरव्हीलच्या मेंबर्सनी राखी बांधून तसेच २०० पुस्तक तळोजा जेलच्या लायब्ररीसाठी दिले. त्यांच्या जीवनातील भाऊ बहिणीच्या सणाचे पावित्र्य राखून आनंद निर्माण केला.

क्लबच्या मेंबर ॲड. संगीता रोकडे यांनी कारागृह प्रशासनाची परवानगी काढली. त्यामुळे क्लबच्या १२ मेंबर्सना प्रवेश घेता आला. क्लब प्रेसिडेंट डॉ. विना मनोहर यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून दोनशे भावांना आनंद मिळवून दिला. यानंतर इनरव्हील क्लब मेंबर ॲड. सुनीता जोशी यांनी कारागृहातील कैद्यांशी संवाद साधला.

विविध पौराणिक आणि ऐतिहासिक उदाहरणे देत देत त्याचा आपल्या आजच्या जीवनाशी संबंध जोडून जे आहे ते स्वीकारून आनंदाने जगावे याचे उत्कृष्ट मार्गदर्शन केले. सर्व श्रोते भावना वश होऊन ऐकत होते अनेकांना अश्रू आवरणे कठीण झाले होते. अशा प्रकारे इनरव्हील क्लब ऑफ पनवेलने हा जिव्हाळ्याचा प्रसंग साजरा करून समाजापुढे एक आदर्श ठेवला यात शंका नाही. इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचा हा उपक्रम गेली दोन वर्ष सातत्याने सुरू आहे.

तळोजा मध्यवर्ती कारागृह अधीक्षक प्रमोद वाघ, अति अधिक्षक गोविंद राठोड, उपअधीक्षक महादेव पवार, जितेंद्र काळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी राहुल झुटाळे, सुनील पाटील, देवराव जाधव आणि गणेश मानकर आदी तळोजा मध्यवर्ती कारागृहाचे अधिकारी कार्यक्रमाच्या वेळेस उपस्थित होते व इनरव्हीलच्या सभासदांनी या सर्वांना राख्या बांधल्या.

यामध्ये डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ. शोभना पालेकर यांचा सिंहाचा वाटा आहे. डॉ. वीणा मनोहर प्रेसिडेंट ऑफ इनरव्हील क्लब ऑफ पनवेल, वंदना लघाटे व्हाईस प्रेसिडेंट, संयोगिता बापट आयपीपी, अंजली कुलकर्णी सेक्रेटरी, मंजिरी नांदेडकर खजिनदार, संगीता रोकडे, संजीवनी मालवणकर, सुनिता जोशी, सुलभा निंबाळकर,अनिता शेट्टये, निवेदिता चौधरी या सर्व सभासद उपस्थित होत्या.

# हेमंत म्हात्रे यांचा सेवापूर्ती सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या न्हावे शाळेचे मुख्याध्यापक आणि गव्हाण केंद्र प्रमुख हेमंत गणपत म्हात्रे यांनी आपली ३५ वर्ष यशस्वी सेवा पुर्ण करून ते सेवानिवृत्त झाले आहे. याबद्दल त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम शुक्रवारी (दि.२३) न्हावे येथील शाळेमध्ये आयोजित करण्यात आला होता.

हा कार्यक्रम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी त्यांनी हेमंत म्हात्रे यांचे अभिनंदन करून पुढील निरोगी आयुष्यासाठी त्यांना सदीच्छा दिल्या. तसेच या ठिकाणी नव्याने एक व्यायाम शाळा आणि दोन वर्ग खोल्या बांधण्यासाठी ४० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागरशेठ ठाकूर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर, नरेश मोकल, प्रकाश कडू, श्रीधर मोकल, ललीता ठाकूर आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# छोट्या व्यापाऱ्यांना आधार हवा

ऑनलाईन खरेदीतून ग्राहकांना सध्या स्वस्त किंमतीत घरपोच वस्तू मिळत असल्या तरी देशातील छोट्या व्यापाऱ्यांचा धंदा बसणे भविष्यात कुणाच्याच हिताचे नाही. ॲमेझॉनच्या एक अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीतून भारतीय अर्थव्यवस्थेला लाभ होणार नाही. अत्यंत स्वस्त दरात वस्तूंची विक्री करून बाजारपेठ काबीज करण्याचे बलाढ्य ई-कॉमर्स कंपन्यांचे धोरण देशातील छोट्या व्यापाऱ्यांना रस्त्यावर आणत आहे, अशी स्पष्ट टीका केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी नुकतीच केल्यामुळे यासंदर्भातील चर्चा नव्याने सुरू झाली आहे.

**भारतात ई-कॉमर्स कंपन्यांचा झपाट्याने विस्तार सुरू असला तरी यात अभिमान वाटण्याऐवजी काळजीची बाब अधिक आहे, असे उद्गार केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी नुकतेच एका कार्यक्रमात काढले. ई-कॉमर्स म्हणजेच ऑनलाईन व्यापार करणाऱ्या कंपन्यांमुळे देशातील परंपरेने वाणसामानाच्या व्यवसायात असलेले छोटे व्यापारी संकटात सापडले आहेत. हे असे होणार याची कल्पना या व्यापाऱ्यांना आधीच होती. त्यामुळे या कंपन्या भारतात आल्या तेव्हाच व्यापाऱ्यांनी त्यांना विरोध केला होता. वस्तू अत्यंत स्वस्त किंमतीत झटपट घरपोच मिळत असल्यामुळे आधी तांत्रिक कौशल्ये अवगत असलेली तरुणाई ऑनलाईन खरेदीच्या प्रेमात पडली. परंतु बघता-बघता ई-कॉमर्स क्षेत्र भारतात झपाट्याने विस्तारत गेले. आज भारतातील ई-कॉमर्स बाजारपेठ ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. देशभरातील ५० टक्क्यांहून अधिक व्यवहार सध्या ई-कॉमर्सच्या माध्यमातून होतात. भारतात या क्षेत्राची वाढ २७ टक्के दराने होत असल्याचे सांगितले जाते. महानगरांमध्ये ऑनलाईन खरेदी लोकप्रिय आहेच, पण दोन व तीन स्तरीय शहरांमध्येही जवळपास निम्म्याहून अधिक खरेदीदार ऑनलाईन खरेदीला पसंती देताना दिसतात. तरुण पिढी आधी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व कपडे आदींसाठी ऑनलाईनकडे वळली होती, परंतु आता किराणा सामानापासून फळे आणि भाज्यांपर्यंत सारे काही मोबाइलवरून मागवण्याचा कल वाढतो आहे. कमी दरात, झटपट वस्तू उपलब्ध होणे ही ग्राहकांसाठी मोठी आकर्षणे ठरतात. ई-कॉमर्स क्षेत्रातील ॲमेझॉनसारख्या बलाढ्य कंपन्या कुठलीही बाजारपेठ काबीज करण्यासाठी सुरूवातीच्या काळात किमती खूप कमी करतात. देशातील पारंपरिक व्यापाऱ्याला इतकी कमी किंमत देणे परवडत नाही. दुकानाचे व्यवस्थापन, त्यासाठीचे कर्मचारी, गोदामे आदींवरील खर्च व्यापाऱ्यांना करावे लागतात. याउलट ई-कॉमर्स कंपन्या चालवणे कमी खर्चिक असते. आणि व्यवसायाची वाढ करण्याच्या दृष्टीने सर्व डेटा त्यांच्या हाताशी असतो. व्यक्तिगत सेवा पुरवून कंपन्या या डेटाचा लाभ उठवतात. कमी किंमतीचा वापर करून बाजारपेठ काबीज करण्याच्या या कंपन्यांच्या धोरणावर यापूर्वी काही विकसित देशांमध्येही टीका झाली आहे. स्वित्झर्लंडसारखे देश त्यामुळे काही प्रमाणात किंमती नियंत्रित करण्याकडे वळले. भारतातील सरकारनेही यासंदर्भात काही नियमावली तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. गोयल यांचे विधान त्या दिशेने पावले उचलली जाण्याचेच सूचक आहे. देशातील पारंपरिक व्यापाऱ्यांना संकटात टाकून विदेशी बलाढ्य कंपन्यांना मोठे होऊ देणे देशाला अर्थातच परवडणार नाही. या कंपन्यांमुळे देशात मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांची निर्मिती झाली आहे हे खरे असले तरी किंमतीसंदर्भातील त्यांच्या आक्रमक धोरणांना चाप लावावाच लागेल. ग्राहक, व्यापारी आणि देशाची अर्थव्यवस्था या तिन्ही घटकांचे हित लक्षात घेऊन सरकारला यासंदर्भातील धोरण ठरवावे लागेल.**

# भेंडखळचा हरिनाम सप्ताह; १५०हून अधिक वर्षांची परंपरा



उरण तालुक्यातील भेंडखळ या गावी पूर्वापार चालत आलेला अखंड हरिनाम सप्ताह जास्तच विशेष आहे, कारण १५६ वर्षापूर्वी वाड-वडिलांनी सुरू केलेला हा सप्ताह आजच्या नवीन पिढीने त्याच संस्काराने आणि त्याच पद्धतीने व भक्ती भावनेने सुरू ठेवला आहे. ८९० सभासदांच्या चार-बाऱ्या अखंड सप्ताहात हरिनामाच्या भजनात आठवडाभर तल्लीन होऊन रंगून जातात. आठवडाभर कुठे एका क्षणालाही मृदुंग कधीही थांबत नाही. सप्ताहचा शेवटचा दिवस म्हणजे जन्माष्टमीचा अत्यंत पारंपारिक रीतीने सर्व लोकांच्या उपस्थितीत रात्री १२च्या दरम्यान कृष्ण जन्माष्टमीचा हा सोहळा होतो.

सोहळा म्हणजे लोकांसाठी पर्वणीच जणू. त्यानंतर असतो तो गोपाळकाला, म्हणजेच काला. एक अविस्मरणीय डोळ्यांचे पारणे फेडणारा सोहळा. काय ती गर्दी, काय तो उत्साह, ढोलांच्या आवाजावर थिरकणारी तरुणाई, हंडी फोडण्यासाठी उडालेली झुंबड, हंडी फुटल्यानंतर होणारा जल्लोष अगदी अवर्णनीय. अगदी भाग्याचा क्षण, १८६८ साली म्हणजे १५६ वर्षांपूर्वी सात-आठ लोकांनी लावलेली हरिनामाची ही वेल आता आभाळा एवढा वटवृक्ष म्हणजे ८९० सदस्य झाले आहेत. या सोहळ्यात अगदी लहान मुलापासून मोठ्या माणसापर्यंत अगदी भक्ती भावाने आणि उत्साहाने सामील होतात.

तसेच कितीही मद्य पिणारे अथवा मांसाहार करणारे असोत, या सप्ताहाच्या काळात पूर्ण शुद्ध शाकाहारी व सात्विक बनून निर्मळ व पवित्र मनाने हा उत्सव साजरा करतात. खरंच आदर्श घेण्यासारखा आहे. सर्व सदस्यांचा एकच आणि अगदी साधा पेहराव म्हणजे हाफ पॅन्ट आणि हाफ शर्ट डोक्यावर टोपी आणि तीही मांगल्याचे आणि पावित्र्याचे प्रतीक म्हणजे पूर्ण सफेद.फार पूर्वीच्या काळी गरीबी, अपुऱ्या सोयी, अस्वच्छता यामुळे पावसाळ्यात हमखास कॉलरापटकी-हायजा अशा अनेक रोगांची साथ येत असे. त्यावेळच्या अनेक संत महापुरुषांनी जनजागृती करून लोकांना स्वच्छतेकडे वळवून रोगराई पासून दूर ठेवले.

त्यावेळी पंजाबवरून आलेले धर्म प्रसारक महान संत जीवनमुक्त स्वामी यांनी अनेक गावांना रोगमुक्त करण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यास प्रयत्न केले. त्यातीलच एक उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील अखंड हरिनाम सप्ताह, जो आजतागात १५६ वर्षे होऊन्ही त्याच उत्साहाने व भक्तीभावाने सुरू आहे. त्यावेळचे ग्रामस्थ शंकर गणा ठाकूर-भिलू धोंड्या ठाकूरलक्ष्मण कुशा ठाकूर-केशव महादेव भोईरनामदेव विठ्ठल घरत, शिवराम कुशा ठाकूर यादव शिवराम ठाकूर, शंकर बाळ्या भोईर हरिभाऊ लक्ष्मण ठाकूर व इतर कडू भगत म्हात्रे यांनी १८६८ साली सर्वप्रथम हरिनाम सप्ताहाला सुरुवात केली.

त्यावेळी दामोदर हरि चांदोरकर हे पुजारी होते. आज १५६ वर्षानंतर उद्धव नामदेव घरत, काशिनाथ शिवराम ठाकूर, अशोक शंकर भोईर व गोपाळ जनार्दन ठाकूर यांच्या नेतृत्वात ८९० सदस्य मनोभावे आणि तन्मयतेने अखंड हरिनामाच्या प्रवाहात स्वतःला वाहून घेत आहेत तसेच चंद्रविलास बळीराम घरत हे सचिव म्हणून कार्य सांभाळत आहेत. आधीच्या लोकांनी स्वच्छतेसाठी व रोगराई दूर होण्यासाठी सुरू केलेला हा हरिनाम सप्ताह आता इतके वर्ष होऊनही गाव सर्व क्षेत्रात अग्रगण्य असूनही, आणि मुख्य म्हणजे गावाला आदर्श स्वच्छ ग्राम पुरस्कार मिळाला आहे. तरीही आपल्या पूर्वजांनी दिलेला वारसा अविरत आणि अखंड चालू ठेवल्याबद्दल संपूर्ण युवा पिढीचा आदर्श आजूबाजूच्या गावातली लोक घेत आहेत.

**(संकलन : उरण प्रतिनिधी, वार्ताहर)**

# युवा नेता ते लढवय्या मंत्री अरुण जेटली

माजी केंद्रीय अर्थमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ताठ ठेवण्यासाठी आपले कौशल्य पणाला लावणाऱ्या अरुण जेटली यांचा आज स्मृतीदिन आहे. वयाच्या ६६व्या वर्षी दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरच श्वास घेतला. फुप्फुसातील संसर्गामुळे त्यांच्यावर उपचार सुरू होते.

२८ डिसेंबर १९५२ रोजी अरुण जेटली यांचा जन्म झाला. दिल्लीतच शिक्षण झालं. विद्यार्थीदशेतच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून युवा नेता म्हणून त्यांनी ओळख मिळवली. वडील पेशाने वकील असल्याने त्यांच्यात तो सभाधीटपणा, वाक्चातुर्य, लढवय्या स्वभाव, नेतृत्व गुण आपोआप आले. त्यांचं प्राथमिक शिक्षण दिल्लीतील सेंट झेवियर्समध्ये झालं. पुढे दिल्लीतील श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्समधून वाणिज्य शाखेत पदवी संपादन केली.

१९७४मध्ये त्यांनी दिल्ली विद्यापिठातून कायदा शाखेतील पदवी मिळवली. दिल्ली विद्यापीठात अभाविपकडून १९७४मध्ये विद्यार्थी नेता म्हणून निवड करण्यात आली. याच काळात त्यांच्यातील नेतृत्व गुण समोर आले आणि त्यांचा त्यांनी विद्यार्थांच्या उत्कर्षासाठी अत्यंत खुबीने वापर केला.

आणीबाणीच्या काळात त्यांनी १९ महिने तुरुंगवास भोगला. १९७३मध्ये



राज नारायण आणि जेपी नारायण यांनी भ्रष्टाचाराविरोधात उघडलेल्या मोहिमेत जेटली एक प्रमुख युवा नेते होते. आणीबाणीनंतर तुरुंगातून सुटल्यानंतर अरुण जेटलींनी जन संघात प्रवेश केला.

चार्टर्ड अकाऊंटंट होण्याची इच्छा असलेले जेटली वकील झाले. सुप्रीम कोर्ट आणि देशातील विविध हायकोर्टांमध्ये त्यांनी वकिली केली. १९९०मध्ये त्यांना दिल्ली हायकोर्टाने वरिष्ठ वकील म्हणून मान्यता दिली.

व्ही.पी. सिंह सरकारकडून १९८९मध्ये जेटलींची अतिरिक्त सॉलिसिटर जनरल म्हणून निवड करण्यात आली. बोफोर्स घोटाळ्याच्या चौकशीतही त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात आली. जनता दलचे नेते शरद यादव, काँग्रेसचे दिवंगत नेते माधवराव शिंदे आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्यासाठी जेटलींनी वकिलीही केली.

भाजपमध्ये अनेक पदांवर जेटलींनी काम केलं. २०१४पर्यंत ते जनतेमधून कोणतीही निवडणूक लढले नव्हते, पण २०१४मध्ये त्यांनी अमृतसरमधून निवडणूक लढले आणि काँग्रेसचे तेव्हाचे उमेदवार कॅप्टन अमरिंदर सिंह यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. यानंतर त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून निवडण्यात आलं. निष्णात वकील असलेले जेटली सभागृहात विरोधकांना तोंड देण्यासाठी एकटेच पुरेसे ठरत असत. मोदी सरकारच्या काळात त्यांनी अर्थमंत्रीपद सांभाळताना अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. संरक्षण मंत्रालयाचीही जबाबदारी त्यांनी काही वेळा सांभाळली. नोटाबंदी, जीएसटी हे जेटलींच्या काळातील महत्त्वाचे निर्णय ठरले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# लवकरच येणार तीन फोल्ड होणारा स्मार्टफोन

स्मार्टफोनचे क्षेत्र असे आहे, ज्यात दररोज नवनवीन डिझाईन आणि फीचर्स असलेले फोन्स येत राहतात.



गेल्या काही वर्षांपासून बाजारात विविध प्रकारच्या डिझाईनचे फोन्स आले आहेत. यामध्ये फोल्डेबल फोन्स सर्वाधिक लोकप्रिय झाले. पण, आता यामध्येही एक मोठा बदल होणार आहे. चीनमधील आघाडीची स्मार्टफोन मेकर कंपनी Huaweiने तीनवेळा फोल्ड होणारा स्मार्टफोन आणण्याची तयारी केली आहे.

सध्या बाजारात जवळपास सर्वच कंपन्यांचे फोल्डेबल फोन्स उपलब्ध आहेत. नुकताच Googleने आपला दुसरा फोल्डेबल स्मार्टफोन लॉन्च केला आहे. Samsungचे फोल्डेबल फोन तर ग्राहकांच्या विशेष पसंतीस उतरले आहेत. आता फोल्डेबल फोनच्या तंत्रज्ञानात चीनी कंपनी Huawei एक पाऊल पुढे गेली आहे. Huawei तीन वेळा फोल्ड होणारा स्मार्टफोन लॉन्च करण्याच्या तयारीत आहे. हा जगातील पहिला ट्रिपल फोल्डिंग स्मार्टफोन असेल.

**कधी लॉन्च होणार? सीईओंनी सांगितले**

मीडिया रिपोर्ट्सनुसार, कंपनीच्या ग्राहक व्यवसाय विभागाचे सीईओ रिचर्ड यू यांच्याकडे हा ट्रिपल फोल्डेबल फोन पाहण्यात आला आहे. याशिवाय, नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात त्यांनी या फोनबद्दल माहिती दिली हीती. कार्यक्रमादरम्यान एका व्यक्तीने त्यांना या फोनच्या लॉन्चिंगबाबत विचारले, त्यावर त्यांनी, पुढच्या महिन्यात फोन लॉन्च होईल, असे सांगितले. मात्र, अध्याप कंपनीने कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.

**huawei ट्राय-फोल्ड स्मार्टफोन**

फोनबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती नाही, परंतु सोशल मीडियावर याच्या स्पेसिफीकेशनबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. या फोनमध्ये १०-इंच स्क्रीन असण्याची अपेक्षा आहे, जी टॅबलेटच्या आकाराची असेल. म्हणजेच, हा फोन पूर्णपणे अनफोल्ड केल्यानंतर टॅब्लेटसारखा दिसेल.

दरम्यान, स्मार्टफोनच्या दुनियेत नेहमीच बदल होत असतात. ग्राहकांना आकर्षिक करण्यासाठी अनेक बदल स्मार्टफोनमध्ये होत असतात.

# श्रेष्ठ कवयित्री बहिणाबाई चौधरी



## निमित्त

प्रतिभावान कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी खानदेशातील असोदे या गावात झाला. असोदे हे गाव जळगावपासून पाच-सहा किमी इतक्या अंतरावर आहे. त्यांच्या वडिलांचे नाव उखाजी महाजन होते आणि आईचे नाव भिमाई होते.

१८८०चा काळ म्हणजेच भारतातील ब्रिटिश राजवटीचा कालखंड होय. या काळात भारतीय सुधारकांची दुहेरी लढाई नुकतीच सुरू झालेली. एकीकडे सामाजिक सुधारणेसाठी समाजातील अनिष्ट रूढींविरुद्ध लढा सुरू होता, तर दुसरीकडे भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांशी टकराव उडत होते.

अशा या संघर्षाच्या काळात बहिणाबाईंचा जन्म झळ. तोही एका शेतकरी कुटुंबामध्ये. तत्कालीन रीतीप्रमाणे बहिणाबाईंचे वडील उखाजी महाजन त्यांनी आपल्या मुलीचा -बहिणाबाईंचा विवाह जळगावच्या नथुजी चौधरी यांच्याशी करून दिला. विवाहाच्या वेळी बहिणाबाईंचे वय फक्त १३ वर्षे होते.

बहिणाबाईंचा संसार हा आधी एकत्र कुटुंब पद्धतीतीलच होता, मात्र काही घरगुती कलहामुळे त्यांचे कुटुंब विभक्त झाले. नव्या ठिकाणी नव्याने संसार उभा करण्याला यश येत असतानाच नथुजी यांचे १९१०च्या काळात निधन झाले. त्या वेळी बहिणाबाईंच्या पदरी तीन लेकरे आणि थोडी जमीन या व्यतिरिक्त दुसरे काहीच नव्हते.

कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी बहिणाबाईंनी शेतीचा आसरा घेतला. विविध परंपरांनी बुरसटलेल्या तत्कालीन समाजात एक विधवा म्हणून जगताना बहिणाबाईंना कुठल्या कुठल्या समस्यांचा सामना करावा लागला असेल याचा तर आपण विचार न केलेलाच बरा.


शेतातील आणि दैनंदिनची कामे करत असतांना मन रमवण्यासाठी प्रत्येकच काळात गीतांनी स्त्रियांना मोठा आधार दिला आहे. जात्यावरच्या ओव्या त्याच प्रकारातील. बहिणाबाईंनीसुद्धा या गीतांचाच आधार घेतला. त्यांच्या बहुतेक रचना या अशाच कुठले न कुठले काम करताना त्यांच्या मुखावर अवतीर्ण झालेल्या आहेत.

स्त्री जीवनाशी हिंदोळे घेणारे वेगवेगळे विषय हेच बहिणाबाई चौधरी यांच्या कविता यामध्ये पुन्हा पुन्हा आढळतांना आपल्याला दिसतील. सासर, माहेर, संसार, शेती, व्यक्तिचित्रे अश्याच विषयांना बहिणाबाईंनी हात घातलेला आहे.

कुठे कुठे त्यांची कविता उपरोधाने भारलेली जाणवते तर कुठे उपदेशाच्या कडू काढ्याने भारलेली. मुळात बहिणाबाई पूर्णतः निरक्षर, पण त्यांच्या कवितांची उंची ही मोठ मोठ्या पंडितांना चाट पाडणारी आहे. त्यांच्या रचना या त्यांचे पुत्र सोपानदेव आणि पुतण्या यांनी लिहून ठेवल्यामुळे आज आपल्यापर्यंत पोचत आहेत.

महाराष्ट्राला एक कवी म्हणून माहिती असलेले सोपानदेव चौधरी हे बहिणाबाई यांचे पुत्र. बहिणाबाईंनी ३ डिसेंबर १९५१ रोजी जगाचा निरोप घेतला. त्यानंतर घराची आवरासावर करत असताना सोपानदेव यांना एक वही सापडली. याच वहीमध्ये लहानपणी त्यांनी त्यांच्या आईने गुणगुणलेली गाणी लिहून ठेवलेली होती. १९५२मध्ये सुचित्रा प्रकाशनाने बहिणाबाईंच्या कविता बहिणाबाईंची गाणी या नावाने प्रकाशित केल्या. त्यांचा मृत्यू ३ डिसेंबर १९५१ रोजी झाला. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**उरण : गौरी गणपतीचा सण जवळ येत आहे. त्यामुळे कारागिर गणेशमूर्तींच्या सजावटीमध्ये मग्न आहेत.** (छाया : दिनेश पवार)

## आरोग्य प्रहर

# सकाळचा नाश्ता टाळणे अपायकारक

सकाळी कामाला उशीर होऊ नये म्हणून लोक अनेकदा नाश्ता वगळतात. बऱ्याच वेळा जास्त वेळ झोपण्यासाठी आपण सकाळचा नाश्ता करणे टाळतो. अनेकदा लोकांना असे वाटते की, सकाळचा नाश्ता वगळण्याने कोणतेही विशेष नुकसान होत



नाही आणि जरी असे झाले तरी दुपारच्या जेवणात थोडे अधिक खाल्ल्याने आपण ही कमतरता दूर करू शकतो. परंतु, जेव्हा तुम्ही महिनाभर ते सतत वगळले तर काय होते? हे जाणून घेऊयात.

बेंगळुरूमधील फोर्टिस हॉस्पिटल्सच्या सल्लागार गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रणव होन्नावरा श्रीनिवासन यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना यासंदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. डॉ. श्रीनिवासन यांनी अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित केलेल्या संशोधनाचा हवाला दिला आहे, ज्यात सूचित केले आहे की, नियमित नाश्ता केल्याने पचनाची समस्या नाहीशी होते. याउलट नाश्ता न केल्यानं टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

डॉ. श्रीनिवासन म्हणतात, अनेक अभ्यासांनी दीर्घकालीन नाश्ता वगळण्याशी संबंधित संभाव्य दीर्घकालीन आरोग्य धोके ओळखले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१. मेटाबॉलिक सिंड्रोम :** अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित मेटा-विश्लेषणात असे आढळून आले की, नाश्ता वगळणे हे मेटाबॉलिक सिंड्रोमच्या उच्च जोखमीशी संबंधित आहे, ज्यामुळे हृदयरोग, स्ट्रोक आणि टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

**२. हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग :** संशोधन असे सूचित करते की, जे लोक नाश्ता वगळतात त्यांना हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारख्या हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांचा धोका जास्त असतो.

**३. टाईप २ मधुमेह :** सार्वजनिक आरोग्य पोषणमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासासह अनेक अभ्यासांनी न्याहारी वगळण्याला टाइप २ मधुमेह होण्याच्या जोखमीशी जोडले आहे. हा अनियमित खाण्याच्या पद्धतींमुळे होणारा परिणाम आहे.

**४. पौष्टिक कमतरता** : नाश्ता वगळल्याने जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर यांसारख्या आवश्यक पोषक घटकांचे अपुरे सेवन होऊ शकते, ज्याचे एकूण आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात.

# पशुसंवर्धनातून उद्योग विकासाला चालना -जिल्हाधिकारी जावळे

## अलिबागमध्ये पशुपालकांना कार्यशाळेत मार्गदर्शन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा, संस्कृतीचा पशुधन हा महत्त्वाचा घटक आहे. पशुपालनाकडे केवळ शेतीला पूरक व्यवसाय म्हणून न पाहता एक चांगला व्यवसाय म्हणून पाहिले पाहिजे. पशुसंवर्धनाला आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यावसायिक मूल्यांची जोड दिल्यास त्यातून उद्योजकता विकासाला चालना देता येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शुक्रवारी (दि.२३) केले.



नियोजन भवन येथे राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत पशुपालकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, उपायुक्त पशुसंवर्धन डॉ.सचिन देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी शाम कदम देशमुख, उपायुक्त रत्नाकर काळे, सहाय्यक आयुक्त डॉ. अजित हिरवे यांसह जिल्हाभरातील पशुपालक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, दुग्ध उत्पादन, अंडी, कुक्कुटपालन, शेळी पालन या व्यवसायाला आपल्या जिल्ह्यात खूप वाव आहे. पशुसंवर्धनाला चालना दिल्यास त्यातून प्रक्रिया उद्योग, विक्री व्यवस्था, वैरण विकास, पशुखाद्य निर्मिती इ. अशा अनेक क्षेत्रात व्यवसाय व उद्योगाच्या संधी निर्माण होतात. त्यामुळे पशुसंवर्धनातून आपण उद्योजकता विकास घडवून लहान लहान उद्योजक घडवू शकतो. त्यातून अनेकांना रोजगाराची संधीही आपण देऊ शकतो. महिला बचतगटांनी कुक्कुटपालन व्यवसायात पुढाकार घ्यावा असे आवाहन केले, तसेच या वर्षात किमान पाच पोल्ट्री तयार करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले. दुग्ध व्यवसाय आणि पूरक जोडधंदेवाढीसाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घ्यावा किमान पाच वैरण राष्ट्रीय पशुधन योजनेचा शेतकऱ्यांनी, पशुपालकांनी अंगिकार करावा. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जावळे यांनी या वेळी केले.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी, जिल्ह्यातील पशुधन वाढीसाठी जिल्हा परिषदेमार्फत प्रभावी उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगितले. बकरी, कोंबडी, शेळीपालन यासाठी जिल्ह्यात चांगल्या संधी आहे. तसेच शासनामार्फत मोठ्या प्रमाणावर अनुदान दिले जाते. जास्तीत जास्त पशुपालकांनी या योजनाचा लाभ घ्यावा असे सांगितले.

उपायुक्त डॉ. देशपांडे यांनी लवकरच सुरू होणाऱ्या पशुगणनेसाठी सर्वांनी सहकार्य करावे, तसेच नागरिकांनी अचूक व बिनचूक माहिती द्यावी असे सांगितले, तसेच शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन, वराहपालन अशा अनेक व्यवसायाकरीता शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या अनुदान आणि अनुषंगिक माहिती दिली. दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत वैरणविकास व गुणवत्ता पूर्वक व्यावसायिक सायलेज उत्पादन, शेळीपालन व्यवस्थापन, कुक्कुटपालन, बँक अर्थसहाय्य इ. विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

# अलिबागमध्ये भाजपची कमळ दहीहंडी स्पर्धा

**प्रथम क्रमांकास दोन लाख २२ हजार २२२ रुपयांचे बक्षीस**



**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष अलिबाग तालुका व शहरतर्फे मंगळवारी (दि. २७) कमळ चषक दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग शहरातील भाजप जिल्हा कार्यालय येथे ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील विजयी गोविंदा पथकास दोन लाख २२ हजार २२२ रुपये, चषक व सन्मानचिन्ह अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत तसेच सलामी देणाऱ्या संघांनाही रोख रकमेची पारिषोतिक देण्यात येणार आहेत. या स्पर्धेस चित्रपट क्षेत्रातील दिग्गज कलाकार हजेरी लावणार आहेत. मिस्टर एशिया सागर कातुर्डे याचे खास आकर्षण असणार आहे, अशी माहिती भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते यांनी गुरुवारी (दि २३) दिली.

अलिबागमधील भाग्यलक्ष्मी सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेस भाजप सहकार आघाडी कोकण विभाग सहसंयोजक गिरीश तुळपुळे, भाजप तालुका अध्यक्ष उदय काठे, शहर अध्यक्ष अ‍ॅड. अंकित बंगेरा, सुनील दामले, युवा नेते निखील चव्हाण, मंगेश माळी हेही उपस्थित होते.

भाजपतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या दहीहंडी स्पर्धेचे हे पाचवे वर्ष आहे. ही स्पर्धा अलिबाग तालुक्यापुरती मर्यादित आहे, मात्र तालुक्याबाहेरील गोविंदा पथकांना सलामी देण्याची संधी देण्याचा विचार सुरू असल्याचे अ‍ॅड. मोहिते म्हणाले.

स्पर्धेत पुरुष आणि महिला असे अलिबाग तालुक्यातील एकूण ७० गोविंदा सहभागी होणार आहेत. चार थरांची सलामी देणाऱ्या महिला गोपिका पथकास चार हजार, पाच थरांची सलामी देण्याऱ्या गोपिका पथकास १५ हजार, तर सहा थरांची सलामी देणाऱ्या पुरुष गोविंदा पथकास १५ हजार रुपयांचे बक्षिस देण्यात येणार आहे. सात थर लावणारे गोविंदा पथक अंतिम स्पर्धेसाठी पात्र ठरणार असून या गोविंदा पथकांमधून चिठ्ठी काढून त्या क्रमाप्रमाणे दहीहंडी फोडण्याची संधी दिली जाईल. स्पर्धेतील विजयी गोविंदा पथकास दोन लाख २२ हजार २२२ रुपये, चषक व सन्मानचिन्ह अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत, असे अ‍ॅड. मोहिते यांनी सांगितले.

# कर्जत-माथेरान मिनीबस सेवा कोलमडली

**माथेरान : प्रतिनिधी**

ऐन सणासुदीच्या तोंडावर कर्जत-माथेरान मिनीबसमध्ये वारंवार बिघाड होत असून कर्जत आगाराकडून मिनीबस फेऱ्या रद्द केल्या जात आहेत. मिनीबस सेवा कोलमडल्यामुळे येथील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



माथेरान हे एक दुर्गम आणि छोटेसे पर्यटनस्थळ आहे. याठिकाणी येण्याकरीता एकमेव घाट रस्ता आहे. सुट्ट्यांच्या हंगामात आणि विकेंडमध्ये नेहमी वाहतूक कोंडी होत असते. घाटरस्ता जाम झाला की मिनीबस फेऱ्या रद्द केल्या जातात. मिनीबस फेऱ्या रद्द केल्याने येथे दररोज ये-जा करणाऱ्या नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. या जुन्या मिनीबस आता जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे या भंगार झालेल्या गाड्या या घाट रस्त्यात अनेकदा बंद पडतात. नादुरूस्त मिनीबस घाट रस्त्यात चालविणे धोकादायक असून अपघात घडल्यास कोण जबाबदार असा सवाल नागरिक येथे विचारीत आहेत.

कर्जत-माथेरान मिनीबस सेवा सध्या स्थितीत कोलमडली असून या घाटरस्त्यासाठी नवीन मिनीबस मिळण्यासाठी प्रयत्न करणे आता गरजेचे असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.

**सध्या स्थितीत कर्जत-माथेरान घाटरस्त्यासाठी एक गाडी सुरू आहे. त्या गाडीच्या इंजिनमध्ये बिघाड झाला होता. त्यामुळे फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. आज गाडी दुरूस्त करून तपासणीसाठी पाठवली आहे. लवकरच मिनीबस सेवा सुरू करण्यात येईल.**

**-डी.एम. शेळके,**
**कर्जत आगार व्यवस्थापक**

# मुरूड-केळघर गाडी रद्द केल्याने प्रवाशांचे हाल

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड एसटी डेपोमधून सकाळी सुटणारी मुरूड-केळघर गाडी वेळेवर सुटली, मात्र दुपारी १ वाजताची ही गाडी रद्द केल्याने प्रवाशांचे हाल झाले.

मुरूड-केळघर एसटी सकाळी प्रवासी घेऊन केळघर गावात जाते. पुन्हा तिच एसटी केळघरवरून मुरूडकडे येते, मात्र गुरुवारी (दि.२२) दुपारी १ वाजता सुटणारी मुरुड-केळघर एसटी ३ वाजले तरी आली नसल्याने प्रवाशांचा स्टँडवर खोळंबा झाला.

या संदर्भात एसटी महामंडळाचे अधिकारी गौतम भोसले यांनी, आपल्या एसटी डेपोतून ३० गाड्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या कार्यक्रमाकरीता रत्नागिरी या ठिकाणी गेल्या होत्या. आज त्या सकाळपासून येण्यास सुरुवात झाली आहे. आलेले ड्रायव्हर झोपले असल्याने आपल्याकडे ड्रायव्हरची कमतरता असल्याने मुरूड-केळघर गाडी रद्द करण्यात आली आहे, अशी प्रतिक्रिया गौतम भोसले यांनी दिली. प्रवासी लक्ष्मण वरक व महादेव भुवड म्हणाले की, अचानक एसटी रद्द करून आम्हाला आर्थिक संकटात टाकले. याबाबत आधी कल्पना देणे गरजेचे होते.




## अर्जंट पाहिजेत

**पनवेल मधील बिल्डर फर्मसाठी अकाउंटेट पाहिजे, बी.कॉम. टॅली, ३-४ वर्षाचा अनुभव व ऑफिस बॉय पाहिजे.**

संपर्क-८३५५८१७७१८/९८१९६९५७७४

## पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **राजाराम जानु मोकल, आशा महादेव पाटील** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः विंधणे (५५३३२४)**
**(PU-ID २६०५९६९८०५८), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३०४/२/३/३ | १ | ०.४७.४० पो.ख. ०.०२.८० | ३.९३ |
| | | एकुण ०.५०.२० | |
| **या एकुण क्षेत्रापैकी विकेते यांच्या हिश्याचे ०.१७.०० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक: २३ ऑगस्ट २०२४**

**सही**
**अ‍ॅड. निलेश बा. झंजाड**

पत्ता :- बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१


# श्रीवर्धन तालुक्यात प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर



**रोहा : महाराष्ट्र बिजनेस क्लब व दसबा फाउंडेशनच्या वतीने तरुण उद्योजक म्हणून शहरातील रुचिका राजेंद्र जैन यांचा माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, आरआयएचे अध्यक्ष पी.पी. बारदेशकर, जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव भगत, माजी उपसभापती अनिल भगत आदी उपस्थित होते.**

**श्रीवर्धन : बातमीदार**

तालुक्यासह संपूर्ण शहरामध्ये प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू आहे. शहरातून उचलल्या जाणाऱ्या कचऱ्यामध्ये प्लास्टिकच्या पिशव्याच जास्त दिसतात. अनेक वेळा गटारांमध्ये, नाल्यांमध्ये प्लॅस्टिकच्या पिशव्या अडकल्याने पाणी तुंबण्याचे प्रकार घडतात. याबाबत प्रशासनाने कारवाई करण्याची गरज आहे.

अशा प्लास्टिक पिशव्यांचा खच आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये विविध ठिकाणी पहायला मिळतो. त्या ठिकाणी घनकचऱ्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. त्या ठिकाणी असलेल्या इमारतींचे सांडपाणी देखील मुख्य रस्त्यावर वाहत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधीचे वातावरण पसरलेले पाहायला मिळते. नगर परिषदेने व तालुका प्रशासनाने या ठिकाणी होणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यासाठी तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून, १) श्री. गणपत राघो बोलाडे २) सौ. निर्मला उर्फ शेवंता दत्तू बोलाडे ३) श्री. पुंडलिक दत्तू बोलाडे ४) श्री. संतोष दत्तू बोलाडे ५) श्री. हनुमंत दत्तू बोलाडे ६) सौ. मनीषा राम जाधव यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे इच्छित आहेत. ज्यांचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टा मध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकती' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- उसर्ली बुद्रुक, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक/ सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र हे. आर. चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १९ | ५ | क्षेत्र ०-४१-०० पो.ख.०-०५-०० | ०.९१ |
| | | एकूण ०-४६-०० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २४.०८.२०२४**
**ठिकाण : मु. पनवेल जि. रायगड**

**सही /-**
**अ‍ॅड. मनीष आर बोहरा**

पत्ता :- १०४,१४२अ, धनश्री बिल्डिंग, एम.सी.सी.एच सोसायटी, मु. पनवेल जि. रायगड ४१० २०६ मोबाईल नं. ९७०२३५११११/७०२१७७९६७९


# सावरोली ग्रामपंचायत हद्दीत नावीन्यपूर्ण उपक्रम; वेळेवर कर भरणाऱ्यांना बक्षिसे

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सावरोली यांनी ग्रामपंचायतीच्या विविध करवसुलीसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. लकी ड्रॉ काढून विजेते यांना बक्षिसे देण्यात आली.



ग्रामपंचायतीचे कर वसूल झाले तरच ग्रामपंचायत विविध प्रकारच्या योजना राबवून गावचा विकास करू शकतात. अनेक ग्रामपंचायती स्वावलंबी आहेत, मात्र करवसुली होत नाही. ग्रामपंचायतींना आपल्या कर वसुलीतून पाणीपुरवठा, दिवाबत्ती, आरोग्य, स्वच्छता आदी योजना राबविण्यासाठी कर वसुली होणे क्रमप्राप्त आहे. तरीही करदाते वेळेवर कर भरत नसल्याने ग्रुप ग्रामपंचायत सावरोली सरपंच संतोष बैलमारे व ग्रामविकास अधिकारी योगेश पाटील यांनी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले व करवसुली केली.

ज्यांनी करवसुली वेळेवर दिली त्यांना लकी ड्रॉ काढून विजेते यांना बक्षिसे देण्यात आली. त्याचप्रमाणे १०वी व १२वी उत्तीर्ण यांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी पाच हजार रुपये अनुदान, शेतकरी यांना २० किलो बियाणे आणि १० किलो खत, ६० वर्षांवरील निराधारांना १५०० अनुदान दिले. या उपक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. त्याचबरोबर ग्रामस्थांनी करदेखील भरले.


## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**निविदा क्र. ३२ सन २०२४-२०२५**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, रायगड-अलिबाग यांचे पत्र क्र. साशा/कार्या-१/५/ इरशाळवाडी/तात्पुरते स्थलांतर/नि.वि. आदेश/२०२४/५३१, दि. ०९.०८.२०२४ नोंदणीकृत निवडक कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा मागविणेत येत आहे. टिप- या निविदेमध्ये एकूण ८ कामे समाविष्ठ असुन निविदा विक्री दिनांक २४/०८/२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक २६/०८/२०२४ रोजी सायंकाळी १५.०० पर्यंत उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : २४/०८/२०२४**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

# सर्वांच्या सहकार्याने सैनिकांना फराळ पोहचतो -डॉ. कीर्ती समुद्र



**विविध क्षेत्रांमधील अधिकारी, पदाधिकारी आणि तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती 'रामप्रहर'च्या संवादप्रहर सदरामध्ये दर शनिवारी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. यामध्ये मान्यवर आपले विचार, मते आणि माहिती मांडणार असून विविध घडामोडींबद्दल भाष्य करतील. वाचकांसाठी हे सदर माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. आजच्या मुलाखतीमध्ये भारत विकास परिषद पनवेलच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र यांच्याशी संवाद साधला...**

रामप्रहर संवादप्रहर

**जवानांसाठी फराळ पाठवण्याची संकल्पना कशी सुचली?**

आमची भारत विकास परिषद पनवेलची शाखा २०१९मध्ये सुरू झाली. आम्ही निरनिराळे उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. त्यानंतर कोविड आल्याने आमचे शाळेमधील संस्कारवर आधारित उपक्रम होऊ शकले नाहीत. त्यावेळचे अध्यक्ष गिरीश समुद्र आणि सदस्या ज्योती कानेटकर यांच्या मैत्रिणींनी आम्ही सैनिकांना दिवाळी फराळ पाठवतो अशी माहिती दिली. त्यांच्या मनात आपण असे काही तरी करूया का? असा विचार आला. आमची शाखा नवीन होती फारसे पाठबळ नव्हते. त्यामुळे लाडू पाठवण्याचे ठरवले. कोविड असल्याने कोठे काही उपलब्ध नव्हते, मग डोंबिवलीचे लाडू सम्राट कानेटकर यांच्या सहकार्यामुळे पहिल्यावर्षी १४ हजार लाडू पाठवले. त्यातून आम्हाला अनुभव मिळाला. दुसऱ्या वर्षी आम्ही संपूर्ण फराळ पाठवण्याचा ठरवले. चिवडा, चकली, शेव आणि लाडू असा डबा बनवला असे तीन हजार बॉक्स आम्ही सीमेवर पाठवले.

**फराळ पाठवण्यासाठी काय करता?**

आम्ही तिथल्या कॅप्टन किवा मेजरना संपर्क करून त्यांच्याकडून किती मागणी आहे याची विचारणा करतो. त्यातूनच आम्ही पाहिल्यावर्षी तीन हजार, मग सात हजार तर मागील वर्षी दहा हजार फराळचे बॉक्स सीमेवर पाठवले. त्यामध्ये चार लाडू सहा चकल्या १५० ग्राम शेव आणि १५० ग्राम चिवडा पाठवतो.

**भारत विकास परिषद ही कोणाची परिषद आहे?**

भारत विकास परिषद ही देश व्यापी राजकीय संघटना आहे. स्वस्थ, समर्थ, संस्कारिक भारत निर्माण करणे हे या संस्थेचे ब्रीद वाक्य आहे. यामध्ये पाच आयाम असतात. संबंध, सहयोग, संस्था, सेवा आणि समर्पण यावर ही सेवा चालते. देशात पंधराशे पेक्षा जास्त शाखा आहेत, पण सैनिकांचा हा उपक्रम फक्त पनवेल शाखेतच आहे असा इतर कोणत्याही शाखेत सुरू झालेला नाही. यावर्षी डोंबिवली शाखा ही या उपक्रमात सहभागी होणार आहे. मागील वर्षी त्यांनी आमच्यासोबत केले यावर्षी ते स्वतंत्रपणे पाच हजार बक्ष पाठवणार आहेत. आमचे यावर्षी उद्दीष्ट १२ हजार बॉक्सचे आहे. हळूहळू इतर शाखा त्यात सहभागी होतील.

**फराळ तुम्ही कोठून व कसा बनवून घेता?**

आम्ही फराळ वेगवेगळ्या विक्रेत्यांशी संपर्क करून घेतो. त्यांच्याकडे योग्य लायसन्स आहेत का याची खात्री करून त्यांना ऑर्डर देतो. लाडू मात्र आम्ही डोंबिवलीच्या कानेटकरांकडूनच घेतो. कारण त्यांनी पहिल्या वर्षापासून आम्हाला सहकार्य केले आहे. त्यांच्याकडून आम्ही पौष्टिक ड्राय फ्रूट घालून लाडू बनवून घेतो. तो थंड ठिकाणी गेला तरी कडक होणार नाही असे प्रमाण घेतो. प्रत्येक पदार्थ दोन ते तीन महीने टिकेल, अशी दक्षता घेतो.

**या वर्षीच्या फराळाच्या ऑर्डरची सुरुवात झाली का?**

हो, आमच्या ऑर्डर गेल्या आहेत. या वर्षीलो आम्ही शंकरपाळे त्यामध्ये वाढवले आहेत. रत्नागिरीच्या एका कंपनीलाआम्ही चकली आणि शंकरपाळेची ऑर्डर दिली आहे. पनवेलच्या मोरे गृह उद्योगाकडे चिवड्याची ऑर्डर दिली आहे. दापोलीच्या विचारेंकडे शेव सांगितली आहे. ४८ हजार लाडू मात्र कानेटकरांकडेच सांगितले आहेत.

**फराळाचे बॉक्स पॅक करून येतात की, तुम्ही करता?**

आम्ही पनवेललाच करतो. बॉक्स बनवण्यापासून लोकसहभागातून करतो. त्यासाठी अनेक नागरिक स्वत:हून येतात आम्ही त्यांना छोटे-छोटे पॅक बनवायला सांगतो जसे दीडशे ग्राम चिवडा व इतर चार लाडू मात्र छोट्या बॉक्समध्ये स्वतंत्र भरतो. तो बॉक्स फराळाच्या मोठ्या बॉक्समध्ये भरतो असे वीस बॉक्स एका मोठ्या बॉक्समध्ये पूर्ण पॅक करून तो रेल्वे किंवा विमानाने पाठवला जातो. या सोबत शुभेच्छा पत्र ही पाठवली जातात. पॅकिंगसाठी शिक्षक विद्यार्थी व ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी ही सहभाग घेतात. त्यांचा एक प्रोजेक्ट होतो आणि आम्हाला मदत ही होते.

**शुभेच्छापत्र कोण देतो की बनवता?**

अनेक जण स्वत: आणून देतात आम्ही शाळेतील मुलांकडून बनवून घेतो. ते खूप छान चांगली बनवून देतात. त्यांना माही फक्त चित्र काढून द्या सांगतो आतला मजकूर आमच्यातील काही जण छान कविता करतात. त्यांचा आम्ही मेसेज बनवून प्रिंट करून त्या शुभेच्छा पत्रात लावतो.

**पॅकिंग कोठे करता?**

चिंतामणी हॉल होता तेव्हा तिथे करायचो, तो आम्हाला विनामूल्या उपलब्ध करून दिला होता. एक रुपया दक्षिणा घेऊन एक महिना वापरायला मिळायचा आता तो रिडेव्हलपमेंटला गेला आहे. त्यामुळे गेल्या वर्षी आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांची जागा उपलब्ध करून दिली होती, तेथे केले होते ती जागा लहानपडत असल्याने यावर्षी नवीन पनवेलमध्ये असलेल्या वृंदावनबाबांच्या आश्रमातील मोठा हॉल त्यांनी एक महिन्यासाठी दिला आहे. २० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात सगळे पॅकिंग करायचे आहे. अनंत चतुर्दशीनंतर आम्ही सुरूवातीला पाच हजार बॉक्सच्या मालाची डिलेव्हरी घेऊ नंतर सात हजार बॉक्सची घेणार आहोत. निधी संकलन कसे होईल त्यावर अवलंबून आहे.





**आपण माल कोठे किंवा कोणत्या एरियामध्ये पाठवायचा हे कसे ठरवता?**

आता आमचे संपर्क निर्माण झाले आहेतच आमचे माजी अध्यक्ष सुबोध भिडे त्या लोकांशी संपर्क करतता. कॅप्टन व मेर्जसना विचारता की तुम्हाला कोणत्या सीमेवर किती पाहिजेत. या वर्षी आम्हाला पूर्ण ऑर्डर मिळाली आहे. कोठे हजार, कोठे साडे शहाशे अशी लेह लडाख ते सियाचीन पर्यंतची ऑर्डर आली आहे. त्याची पोच पावती म्हणजे ते आम्हाला फोटो पाठवता अगदी बर्फातीलसुध्दा हाता बॉक्स घेतलेले जवानणाचे फोटो येतात.

**तुम्ही बॉक्स कसे पाठवता व सैनिकांना मिळाल्याचे कसे समजते?**

लेह, लडाख भागात विमानाने पाठवले जातात. बाकी सर्व आम्ही रेल्वेने पाठवून त्यांना कळवतो मग तेथे त्यांच्यातर्फे त्याची डिलेव्हरी घेतली जाते. तेच पुढे घेऊन जातात. त्याची रिसिट पाठवता. फोन करून सांगतातच पण फोटो ही पाठवतात. काही सैनिक ही आवर्जून फोन करून आनंद झाला फराळ आवडल्याचे सांगतात. आपल्या महाराष्ट्रातील सैनिकांना आपला फराळ पाहून इतका आनंद होतो की ते म्हणता मला आईची आठवण झाली किंवा घरची आठवण आली आणि ते बाकीच्या सगळ्यांना सांगतात हा माझ्या घरून फराळ आला आहे. म्हणजेच त्यांना आपला फराळ खूप आवडतो.

**तुमच्या लक्षात राहिलेली एखादी प्रतिक्रिया कोणती?**

अनेक सैनिकांना गहिवरून येते. तुम्ही आमच्यासाठी एवढा विचार करता याचाच आम्हाला खूप आनंद आहे. मग ते १५ ऑगस्ट २६ जानेवारीलासुध्दा आपल्याला फोन करतात. त्यांच्या अधिकाऱ्यांची ही आम्हाला पत्र येतात.

**कामात कोणाची मदत होते?**

आमचे सगळे सदस्य तर करतातच, पण सदस्य नसलेललेही ही मदत करतात. ज्यांना माहीत झालेले आहे ते आतापासूनच विचारता आहेत कधी करणार आम्ही कोठे येऊ. पनवेलमधील नागरिक, महिला आहेत. यावर्षी शाळातील शिक्षकही सहभागी होतील. शाळेतील विद्यार्थ्यांचाही उत्साह खूप आहे. आम्ही ही सर्व कामे शनिवार, रविवारी करतो. इतर दिवशी ज्यांना वेळ असेल तेव्हा ते येऊन करतात.

**निधी संकलनासाठी काय करता?**

काही लोक स्पॉन्सर करतात. इतर सर्वसाधारण लोकांसाठी आम्ही एक मेसेज पाठवतो. त्यात एक लिंक आहे. त्यामध्ये गुगल पे लिंक आणि क्यूआर कोड आहे. तो मेसेज सगळीकडे जातो. तो अनेक जण आपल्या ओळखीच्या लोकांना पाठवतात. लिंक ओपन केली की तो सैनिक हो तुमच्यासाठी पनवेल शाखा या पेजवर घेऊन जातो. त्यामध्ये ज्यांना निधी द्यायचा आहे त्यांनी आपली माहिती भरली की त्यांना रिसिट इमेलवर मिळते. त्यांनी कमीत कमी पाचशे रुपये द्यावेत असे सांगतो. आम्हाला एक बॉक्स पॅक करून पाठवण्याचा ३०० ते ३५० रुपये खर्च येतो. आमचे टार्गेट पूर्ण झाले की आम्ही निधी घेणे बंद करतो.

**फराळ तर पाठवताच, पण आणखी काही योजना आहे का?**

दोन वर्षांपासून पनवेल परिसरात ज्या वीर पत्नी आहेत. त्या शहीद झालेल्या सैनिकांच्या पत्नींची आम्ही भेट घेऊन त्यांच्याशी गप्पा मारून, बोलून त्यांनाही फराळ देतो. अजून छोट्या प्रमाणात आहे. मोठ्या प्रमाणात ते सुरू केले नाही.

**तुमची पुढची योजना काय आहे?**

आमचे असे एक स्वप्न आहे की, आपल्या देशातील प्रत्येक सैनिकांपर्यंत आपला फराळ पोहचवा. सीमेवरच्या एकूण एक सैनिकांपर्यंत फराळ पोहचला पाहिजे, त्यासाठी भारत विकास परिषदेच्या इतर शाखांनी ही हा उपक्रम सुरू केला तर निश्चितच पूर्ण होईल. कारण त्यांना तिथे कोणताही सणवार समजत नाही. आमचा फराळ हीच त्यांची दिवाळी असे ते म्हणतात.

**तुम्ही आमच्या माध्यमातून लोकांना काय आवाहन कराल?**

हा जो उपक्रम आहे ते भारत विकास परिषदेचा असला तरी पनवेलमधील नागरिकांनाही त्यामध्ये सहभागी होण्याची ही एक संधी आहे. तुमच्यातर्फे ही आपल्या वीर सैनिकांना आपला फराळचा बॉक्स जाऊ देण्याची आम्ही तुम्हाला संधी उपलब्ध करून देत आहोत. आमच्याशी संपर्क करा माही त्याची माहिती देऊ. पॅकिंगसाठी इच्छा असेल तरी आम्हाला संपर्क करा आम्ही तुम्हाला संधी देऊ.

**निधी पाठवण्यासाठी लिंक**

https://rzp.io/l/bvppanvelsainikho अधिक माहिती, तपशिल किंवा शंकांसाठी आपण यांना संपर्क करू शकता. डॉ. कीर्ती समुद्र, अध्यक्ष भारत विकास परिषद पनवेल ९८६७५ ७९५६५, पद्मजा कुलकर्णी, सचिव, भाविप पनवेल ९७०२९१९३३९, शीतल विचारे, कोषाध्यक्ष, भाविप पनवेल ९३२४७६०३७८, ज्योती कानिटकर, संपर्क प्रमुख, भाविप पनवेल ८४२४०४८२५३

**(शब्दांकन : नितीन देशमुख)**

# पनवेलमध्ये निवृत्त पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास हॉलमध्ये निवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी कल्याणकारी असोसिएशनची झाली असून या बैठकीला संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मिळुन १३० सदस्य उपस्थित होते.



यासाठी प्रमुख पाहुणे सुरेंद्र मानधने निवृत्त स.पो.आ.व तसेच संघटनेचे अध्यक्ष विनोद चव्हाण, कार्याध्यक्ष सिद्धेश्वर कांबळे, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, विभा चव्हाण, सं.सल्लागार मंदार नाईक, उपाध्यक्ष देवीदास सोनावणे, उपाध्यक्ष सोपान चौधरी, उपाध्यक्ष गोपाळ दाभाडे, कार्यकारिणी सदस्य गोपीचंद पाटील, बाळकृष्ण मोटे, नंदु शिंदे, संखे, सत्रे आदी उपस्थित होते. यावेळी जेष्ठ नागरिक दिवसाचे औचित्य साधून ज्या निवृत्त पोलीस अधिकारी अंमलदार यांचे वय ७५ झाले आहे. त्यांचा सन्मान पुर्व सत्कार करण्याचे ठरले प्रमाणे पैकी १३ जेष्ठ नागरिक निवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी किसन महादु महाजन, विश्वनाथ गणपत विचारे, दलपत कृष्णा साबळे, रमेश खंडु दगडे, कमलाकर हसु थळे, संपत लक्ष्मण नाळे, मानसिंग वामन कदम, लक्ष्मण तुकाराम साळुंखे, गजानन मोहीते, रामचंद्र बाबुराव ताटे, कामटे मॅडम, चंद्रकांत थळे, पांडुरंग कमलया भातघरे यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला व त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

त्याचप्रमाणे डीवायएसपी शिवाजी फडतरे यांना नुकतेच शासनाने राष्ट्रपती पदकाने सन्मानीत केल्याने त्यांचाही शाल श्रीफळ देऊन मानधने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रथम संघटनेच्या उपाध्यक्षा विभा चव्हाण यांनी या संघटनेची स्थापना सन २०१६ मध्ये होवुन सन २०१६ ते २०२१ पावेतो अध्यक्ष पदाचा कार्यभार श्रीराम गोरे यांनी अतिशय उत्कृष्ट पणे संभाळला आहे, मात्र त्यांची प्रकृती साथ देत नसल्याने संघटनेच्या केंद्रीय सुचने नुसार आणि पदाधिकार्यांचे मतानुसार संघटन कौशल्य विनोद चव्हाण यांची अध्यक्ष पदी सर्वानुमते निवड करण्यात आली आणि त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून अडचणींवर मात करत कार्यालयास जागा नसताना पनवेलमध्येच आपली स्वताची जागा संघटनेच्या कार्यालयास देवुन सर्वांचे सहकार्याने अविरतपणे काम चालु केले आहे.

# पीएनजी ज्वेलर्सतर्फे महा मंगळसूत्र महोत्सव

## तब्बल २००० नव्या डिझाईन्स सादर

**पुणे : प्रतिनिधी**

१९२ वर्षांचा समृद्ध वारसा आणि उत्कृष्टतेची बांधिलकी असलेल्या पीएनजी ज्वेलर्सचे बहुप्रतीक्षित मंगळसूत्र महोत्सव यंदा २० व्या वर्षात पदार्पण करत आहे. यानिमित्ताने पीएनजी ज्वेलर्सतर्फे ट्रॅडिशनल, मॉडर्न, लाइट वेट, हेरिटेज, पोल्की, डायमंड व गोकाक अशा सात विविध श्रेणींमध्ये मंगळसूत्रांच्या तब्बल २००० नव्या डिझाईन्स सादर करण्यात येणार आहेत.

पीएनजी ज्वेलर्सचा मंगळसूत्र महोत्सव हा बहु-प्रतिक्षित वार्षिक उपक्रम असून त्यात परंपरा, वारसा, दिमाख व आधुनिकता यांचा संगम असणाऱ्या मंगळसूत्र डिझाईन्सची विस्तृत श्रेणी प्रदर्शित केली जाते. यंदाच्या या उपक्रमाला महा मंगळसूत्र महोत्सव असे उचित शीर्षक देण्यात आले असून तो नक्कीच आजवरचा भव्य महोत्सव ठरणार आहे. पीएनजी ज्वेलर्सच्या महाराष्ट्र व गोव्यातील सर्व स्टोअर्समध्ये साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवात प्रत्येकाच्या पसंती व शैलीनुसार मंगळसूत्र डिझाईन्सचा अजोड संग्रह याद्वारे प्रदर्शित करण्यात येत आहे.

मंगळसूत्र महोत्सव हा पीएनजी ज्वेलर्सचा आघाडीचा उपक्रम असून गेली दोन दशके तो ग्राहक संपर्कातील कोनशिलाच राहिला आहे. या उपक्रमात परंपरा व समकालीन फॅशन या दोन्हीचा मान राखणारा विशाल संग्रह देऊ केला जातो. यंदाचा महा मंगळसूत्र महोत्सव ग्राहकांना डिझाईन्समधील अजोड विविधता देऊन त्यांचा खरेदीचा अनुभव वृद्धिंगत करणार आहेच, परंतु या महोत्सवाच्या २०व्या वर्षातील यशस्वी पदार्पणाचा महत्त्वाचा टप्पाही साजरा करणार आहे.

५ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत ग्राहकांसाठी महा मंगळसूत्र महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. हा महा मंगळसूत्र महोत्सव महाराष्ट्र व गोव्यातील दागिनेप्रेमींना या अनोख्या डिझाईन्स पाहण्याची व खरेदी करण्याची खास संधी पुरवणार आहे. महोत्सव काळात पीएनजी ज्वेलर्सतर्फे सोन्याच्या मंगळसूत्रांच्या घडणावळीवर ४० टक्क्यांपर्यंत सवलत, तर हिऱ्याच्या मंगळसूत्रांच्या घडणावळीवर थेट ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.

या संदर्भात बोलताना पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, मंगळसूत्र महोत्सवाचे २० वे वर्ष साजरे करताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटत आहे. यंदाच्या महा मंगळसूत्र महोत्सवातून अभिनवता व परंपरा याबाबतची आमची बांधिलकी व्यक्त होते. सात वेगवेगळ्या श्रेणींमध्ये २००० हून अधिक नव्या डिझाईन्स सादर करुन आम्ही आमच्या ग्राहकांना भारतीय स्त्रीच्या प्रत्येक स्टाईल व पसंतीची पूर्तता करणाऱ्या मंगळसूत्र डिझाईन्सचा अजोड संग्रह देऊ करत आहोत. मंगळसूत्र महोत्सवाची वर्षभर प्रतीक्षा करणाऱ्या असंख्य ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्याची आशा आम्ही बाळगून आहोत.

## उकाड्यात 'सरीं'चा दिलासा

**पनवेल :** बऱ्याच दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाच्या सरी शुक्रवारी रात्री ८ नंतर यायला सुरुवात झाल्याने हवेत काहीसा गारवा निर्माण झाला होता. उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कर्मचारी नंदेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

रामप्रहर श्रावणधारा

## श्रावण आला

श्रावण आला श्रावण आला
बहरत, फुलवित वसुंधरेला
श्रावण आला श्रावण आला
रिमझिम रिमझिम रिपरिप त्याची
आनंदाची, उल्हासाची
रानोरानी असा बरसला
श्रावण आला श्रावण आला ।।१।।

श्रावणात या भिजली धरती
भिजली पाने भिजली माती
चराचरी तो असा बरसला
श्रावण आला श्रावण आला ।।२।।

पावसात कुणा भिजवतो श्रावण
मनात कुणाला छळतो श्रावण
धरेवरी श्रावण अवतरला
श्रावण आला श्रावण आला ।।३।।

श्रावणाने या रंग उधळले
धरती आनंदाने डोले
इंद्रधनु हा सप्तरंगी
क्षितिजावरती असा उधळला
श्रावण आला श्रावण आला ।।४।।

टप-टप पानांमधुनी श्रावण
सर-सर धारांमधुनी श्रावण
मेघ सावळा शाम होऊनी
ये राधेला भिजवायाला
श्रावण आला श्रावण आला ।।५।।


कधी - कधी पेटतो श्रावण
अंतरी वेदना मनात स्पंदन
एकांती श्रावण बिलगला
श्रावण आला श्रावण आला ।।६।।



-प्रा. सुकुमार पाटील,
रोहा, रायगड

## निवडक

### चोरढे येथे शैक्षणिक साहित्य वाटप



**रेवदंडा** : चोरढे राजिप शाळा व महात्मा गांधी विद्यमंदिर येथे विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. हा उपक्रम सोमजाई माता क्रीडा मंडळ ट्रस्ट खरसई–म्हसळा यांचे वतीने आयोजित करण्यात आला होता. या वेळी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत खोत, उपाध्यक्ष रामचंद्र मांदारे, सचिव दत्ताराम पेयर, संचालक काशिनाथ कोकाटे, संचालक भालचंद्र शिलकर, चोरढे महात्मा गांधी विद्यामंदिर अध्यक्ष धर्मा भोईर, उपाध्यक्ष काशिनाथ तांबडे, खजिनदार हरिश्चंद्र तांबडे, संचालक अनिल चोरढेकर, संचालक राम भोपी, माजी सरपंच बाळकृष्ण भोपी, ग्रामपंचयत सदस्य प्रमिला चोरढेकर, ज्ञानेश्वर डोलकर, माजी अध्यक्ष भाजप महेंद्र चौलकर, शाळा व्यवस्थापन मराठी शाळा व्यव्स्थापन समिती अध्यक्ष सुरेश तांबडे, राजिप शाळा चोरढे दिपेश चोरढेकर, दिनानाथ मोरे संचलित व महात्मा गांधी विदयामंदिर चोरढे शाळेचे शिक्षक, उपस्थित होते.

### बदलापूर येथील घटनेचा निषेध



**कर्जत** : बदलापूर येथे झालेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी पोलीस मित्र सुरक्षा परिषद यांनी कर्जत पोलीस ठाण्यात निषेध केला. बदलापूर येथील घडलेल्या प्रकाराचा निषेध करतानाच नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी करणारे निवेदन पोलिसांना पोलीस मित्र संघटना यांच्या वतीने देण्यात आले. या वेळी पोलीस मित्र सुरक्षा परिषदेचे संस्थापक ज्ञानेश्वर साळोखे, प्रदेश अध्यक्ष किशोर शितोळे तसेच तालुकाध्यक्ष मंगेश पडवळ, संतोष पवार, वासुदेव बडेकर, शांताराम मुरकुटे, नरेश भोईर आदी उपस्थित होते.

### चौकमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**चौक** : विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित विद्यामंदिर सारंग शाळेत एसएससी, इयत्ता आठवी, नववी वार्षिक परीक्षेमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उद्योगपती सचिन दळवी यांच्या हस्ते झाला. विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभा देशमुख उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांचा रोख रकमेची पारितोषिके, पुष्पगुच्छ, शाल व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी सचिन दळवी यांनी, शैक्षणिक कार्यासाठी लागणारी आवश्यक मदत मी करेन, असे आश्वासन दिले. प्रास्ताविक प्रभारी मुख्याध्यापक पाटील यांनी केले. सूत्रसंचालन शुभांगी शिंदे यांनी केले. बाविस्कर यांनी शिक्षक मनोगत व आभार प्रदर्शन केले.



# खालापुरातील सात ग्रामपंचायतींचा गौरव

### १०० टक्के क्षयरोगमुक्ती

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील तुपगाव, टेंभरी, शिरवली, माणकिवली, होराळे, नंदनपाडा आणि चिलठण या सात ग्रामपंचायती, १०० टक्के क्षयरोगमुक्त होण्याचा मान मिळविला आहे. ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक आणि सरपंच यांचा गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्च २०२३मध्ये क्षयरोगमुक्त पंचायत हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. गावपातळीवरील आरोग्य संस्था, उपकेंद्र कर्मचारी व अधिकारी तसेच ग्रामपंचायतच्या पाठिंब्याने क्षयरोग उच्चाटन मोहीम सुरू आहे. क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत असे अभियान राबविण्यात येत आहे. क्षयरोगाचे निर्मूलन करण्यासाठी तालुक्यातील ४४ ग्रामपंचायतीमध्ये १००० लोकसंख्येमागे ३४ जणांची तपासणी करण्यात येत आहे. तालुक्यातील सात ग्रामपंचायतीमध्ये एकही क्षयरोगी न आढळल्याने ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवकांचा सत्कार पंचायत समिती कार्यालय खालापूर ते आयोजित करण्यात आला होता.

या वेळी खालापूर पंचायत समितीचे वरिष्ठ गटविकास अधिकारी संदीप कराड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कल्याणी इंगोले, वावोशी वैद्यकीय अधिकारी मानसी कस्तुरे, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक महेंद्र पिंगळे, वरिष्ठ औषधउपचार पर्यवेक्षक समाधान धनवे, तालुका विस्तार अधिकारी अमित म्हस्कर, प्रशांत अंबुर्ले, टेंभरी ग्रामपंचायत सरपंच रमेश गायकवाड, तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार, शिरवली सरपंच महेश पाटील, होराळे सरपंच नीलम भिकोट, नंदनपाडा सरपंच गोविंद वाघमारे, मानकिवली सरपंच बाळू वाघमारे यांच्यासह तालुक्यातील आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

> **तालुका क्षयरोगमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग, ग्रामपंचायत स्तरावर अतिशय उत्कृष्ट काम सुरू आहे. सात ग्रामपंचायतींपासून प्रेरणा घेऊन तालुका क्षयरोगमुक्त करण्याचे उद्दिष्ट असेल. ग्रामपंचायतीने केलेल्या कार्याचा गौरव केल्यामुळे इतर ग्रामपंचायतींना प्रेरणा मिळेल.**
>
> **–संदीप कराड, वरिष्ठ गटविकास अधिकारी, खालापूर पं.स.**

## कर्जत कीकवी येथे चिल्लार नदीत बुडून तरुणीचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील भोपळेवाडी येथील राहणारी वैशाली भरत ठोंबरे या तरुणीचा मामाच्या गावी आल्यावर येथील चिल्लार नदीमध्ये बुडून मृत्यू झाला. रक्षाबंधनासाठी आलेली वैशाली आपल्या दोन मैत्रिणींसह नदीवर कपडे धुण्यासाठी गेली होती.



कीकवीजवळील बोरवाडी येथील हासू नरेश पादीर यांची नांदगाव ग्रामपंचायतीमधील भोपळेवाडी येथे राहणारे भाची रक्षाबंधनासाठी मामाकडे आली होती. गुरुवारी (दि.२२) सकाळी कपडे धुण्यासाठी वैशाली ही आपल्या मैत्रिणी पूजा देवरे, सोनाली सुभाष भुजाडा आणि मामाची मुलगी पूनम पादीर यांच्यासह चिल्लार नदीवर कपडे धुण्यासाठी निघाल्या होत्या. नदीवर २० वर्षीय वैशाली भरत ठोंबरे हिचा पाय नदीवरील खडकावरून घसरला व ती नदीत पडली. पाण्यात बुडालेल्या आपल्या मैत्रिणीला वाचविण्यासाठी इतरांनी पाण्यात उड्या घेतल्या, मात्र त्या ठिकाणी पाणी खोल असल्याने वैशाली पाण्यात बुडाली. ग्रामस्थांना ही माहिती मिळाल्यानंतर ग्रामस्थ नदीवर पोहचले. तब्बल दोन तासांच्या प्रयत्नांनंतर वैशाली ठोंबरे हिचा शोध लागला आणि थेट कशेळे ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. त्या वेळी डॉक्टरांनी वैशाली भरत ठोंबरे हिचा मृत्यू झाला असल्याचे जाहीर केले. शवविच्छेदन करून मृतदेह पालकांचे ताब्यात दिला.

त्या ठिकाणी महसूल मंडळ अधिकारी किरण बोरसेकर, तलाठी पार्वती वाघ यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. संबंधित प्रकरणी कर्जत पोलीस ठाणे येथे आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## सण, उत्सवात नियम पाळा –देवीदास मुपडे

**रोहे : प्रतिनिधी**

सण उत्सव शांततेत पार पाडण्यात यावे यासाठी प्रत्येक मंडळाने नियमांचे पालन करावे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन रोहा पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे यांनी केले.



गोपाळकालानिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीसंदर्भात गावकीचे प्रमुख, गोविंद पथकाचे प्रमुख, मंडळाचे अध्यक्ष, पोलीस पाटील, शांतता समितीचे सदस्य यांची रोहा पोलीस स्टेशन येथे बैठक झाली. त्या वेळी ते बोलत होते. रोहा पोलीस स्टेशन हद्दीत सार्वजनिक १५७, खासगी ७२ दहीहंडी बांधण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीला महेश कोलाटकर, मयुर दिवेकर, महेश रोकडे, चंद्रकांत कडू, समाधान शिंदे, आदित्य कोंडाळकर, उमेश लोखंडे, घनश्याम कराळे, अमित मोहिते, रमेश साळवी, जालिंदर शेवाळे, यज्ञेश भांड, महेश बामुगडे, आनंद काळे, चंद्रकांत पार्टे, राहुल बोबड, आठवले आदी उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे यांनी, आपण सर्वांना परवानगी नियमानुसार देत आहेत. वरच्या गोविंदांनी हेल्मेटचा वापर करावा. आवाजाबाबत मर्यादा पाळावे, वाहातुकीस अडथळा होऊ नये, हंडी ठिकाणापासून १०० मीटर अंतरावर गाडी पार्किंग व्यवस्था करण्यात आले पाहिजे. गर्दीच्या ठिकाणी चेंगराचेंगरी होऊ नये यासाठी काळजी घ्यावी. कार्यक्रमाच्या ठिकाणी रुग्णवाहिका ठेवण्यात यावे, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे, आक्षेपार्ह बॅनर लावू नये अशा सूचना दिल्या.

## धैर्यशील पाटील राज्यसभेवर; नागोठण्यात भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष

**नागोठणे : बातमीदार**

भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील यांची राज्यसभेसाठी बिनविरोध निवड जाहीर झाल्यानंतर नागोठणे शहर व विभागातील भाजप कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांच्या अतिशबाजीत जल्लोष केला.



जल्लोष साजरा करताना भाजप नेते किशोर म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, शहर अध्यक्ष सचिन मोदी, युवा मोर्चा सरचिटणीस मोरेश्वर म्हात्रे, उत्तर भारतीय जिल्हा संयोजक राजन दुबे, ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश जैन, शामकांत नेरपगार, अशोक अहिरे, धनराज उमाळे, तिरत पोलसानी, विठोबा माळी, सुदेश येरुणकर, गणेश घाग, प्रमोद नागोठणेकर, ॲड. रमण जाधव, तेलंगे, जावेद दापोलकर आदी प्रमुख भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

आपल्या महायुतीच्या सरकारने गोरगरीब जनतेसाठी अनेक योजना आणलेल्या असून या योजना राबवित असताना काही नागरिकांना अनेक अडचणींना समोर जावे लागत आहे. लाडकी बहीण योजनेला तमाम बहिणींचे प्रोत्साहन मिळाले असले तरी अनेक बहिणींना या योजनेचा लाभ झालेला दिसून येत नाही, परंतु ज्या बहिणींना लाडकी योजनेचा लाभ झाला नसेल अशा बहिणींनी आपल्या नागोठणे भाजप जनसंपर्क कार्यालयात संपर्क साधावा (९८२२०४०४८५) त्यांच्या सर्व त्रुटी आपण सर्व मिळून दूर करू, असे आवाहन नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी केले.

## पेणच्या सुंदर, सुबक गौराईंनाही पसंती

### तीन हजार मूर्तींसह पाच हजार मुखवटे तयार

**पेण : रामप्रहर वृत्त**

श्रीगणेशाच्या आगमनानंतर गौराईची प्रत्येक माहेरवाशीण आतुरतेने वाट पाहत असते. रायगड जिल्ह्यातील अनेक समाजांत गौराईचा वेगळा थाटमाट असतो. त्यामुळेच तिची मूर्तीही आकर्षक असावी असे भाविकांना वाटते. यंदा पेणमधील कार्यशाळांत तीन हजार गौराई मूर्ती, तर पाच हजार मुखवटे तयार करण्यात आले आहेत.

रायगड जिल्ह्यातील पेण, अलिबाग, उरण, पनवेल आणि मुरूड तालुक्यातील गौराईच्या पूर्णाकृती मूर्तीची मागणी अधिक आहे, तर ठाणे, नवी मुंबई येथील आगरी कोळी समाजातील अनेक भाविक या मूर्तीची मागणी नोंदवितात.



प्रत्येकाच्या आवडीनुसार या देवीची मूर्ती सजविण्यात येते. तिला अलंकार, विविधरंगी वस्त्रांनी सजविण्यात येते. प्रत्यक्ष ही मूर्ती दीड फूट ते अडीच तीन फुटांपर्यंत मर्यादित उंचीची असते. सध्या पेणमधील कार्यशाळांत एकापेक्षा एक सुंदर अशा गौराईच्या मूर्ती तयार आहेत.

रायगड जिल्ह्यातील प्रत्येक गावात सरासरी दोन किंवा तीन मोठ्या कुटुंबांत गौराईची प्राण केली जाते. आता मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथील मागणी वाढली आहे. पूर्णाकृती मूर्ती ही कोकण पट्ट्यातच प्रसिद्ध आहे. अन्य शहरांत गौरीचे मुखवटे नेले जातात. परंपरेनुसार मुखवट्याची गौराई सजविली जाते. अखंड मूर्ती साजशृंगाराने नटविली जाते तेव्हा कलाकारांच्या परिश्रमाचे कौतुक केले जाते.



**माणगाव : भाजप प्रदेश कार्यालय मुंबई येथे झालेल्या कोकण विभाग युवा मोर्चा प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत नवनिर्वाचित युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांचे दक्षिण रायगड युवा मोर्चातर्फे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, सहकारी कार्यकर्ते परेश सांगळे, मंदार मढवी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## रायगडात बुधवारी राष्ट्रीय लोकअदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये बुधवारी (दि.२८) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती न्यायाधिश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमोल शिंदे यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाहविषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोकअदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ए.एस. राजंदेकर यांनी केले आहे.

## वाडगावमध्ये जिल्हास्तरीय तपासणी समितीची भेट

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव ग्रामपंचायतीत जिल्हास्तरीय तपासणी समितीने नुकतीच भेट दिली. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान कोकण विभागस्तरीय पुरस्कारासाठी वाडगाव ग्रामपंचायतीची तपासणी समितीमार्फत करण्यात आली.

या समितीमध्ये ठाणे जि.प.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जलजीवन मिशन प्रकल्प संचालक अतुल पारसकर, राजिपच्या प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता विभागाच्या शुभांगी नाखले, जयवंत गायकवाड व रवींद्र गायकवाड, अलिबाग पं. स. सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, रूपाली पाटील आदींचा समावेश होता. प्रारंभी ग्रामपंचायतीचे वतीने तपासणी समितीचे वाजत गाजत मिरवणुकीने स्वागत करण्यात आले.

या वेळी सरपंच सारिका पवार, उपसरपंच जयेंद्र भगत, ग्रामविकास अधिकारी बाबुराव तुलशीराम वणवे, सदस्य सरिता भगत, निलम थळे, शुभांगी भगत, रूपाली पाटील, संतोष बोले, संजना नाईक, रमेश भगत, माजी मुख्याध्यापक रवींद्र ठाकूर, किरण भगत, माजी उपसरपंच प्रसाद पाटील, नरेश थळे, माजी सरपंच सिताराम भगत, मधुकर भगत, किरण लाखण, संजना नाईक आदी उपस्थित होते.

तपासणी समितीने ग्रामपंचायतीचे दप्तर व इतर माहिती घेतल्यानंतर व्यायामशाळा, अंगणवाडी, राजिप शाळा आदीची पाहणी केली.



# नीरज चोप्राने मोडला ऑलिम्पिक रेकॉर्ड

## डायमंड लीगमध्ये ८९.४५ मीटर भालाफेक

## ५ सप्टेंबरला फायनल



**ज्युरिच : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याने लौजाण डायमंड लीगमध्ये चमकदार कामगिरी केली आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. या स्पर्धेत नीरजने नुकताच पॅरिस ऑलिम्पिकमध्ये केलेला त्याचा विक्रम मोडला. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये त्याने ८९.४५ मीटर भालाफेक करून रौप्यपदक जिंकले होते, परंतु दुखापतग्रस्त असतानाही डायमंड लीगमध्ये त्याने स्वतःचा विक्रम मोडला आहे.

नीरजने मोसमातील सर्वोत्तम थ्रो करत डायमंड लीगमध्ये दुसरे स्थान मिळविले. हा या हंगामातील त्याचा सर्वोत्तम थ्रो होता, परंतु तो ९० मीटरचा टप्पा गाठू शकला नाही आणि त्याचा वैयक्तिक विक्रमही तोडू शकला नाही. नीरजच्या कारकिर्दीतील त्याचा सर्वोत्तम थ्रो ८९.९४ आहे, पण या वेळी त्याने पॅरिस ऑलिम्पिकमधील त्याचा विक्रम मोडला.

भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहचण्यासाठी (तिसरा लेग) नीरजने दुसरे स्थान पटकावले. ग्रेनेडाच्या पीटर अँडरसनने ९०.६१ मीटर भालाफेक करून पहिले स्थान पटकावले. जर्मनीचा ज्युलियन वेबर ८७.०८ मीटर भालाफेक करत तिसरा राहिला.

नीरज चोप्रा सध्या दुखापतीने त्रस्त आहे. त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागणार आहे, पण तरीही त्याने या लीगमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. दुखापतीचा परिणाम त्याच्यावरही दिसत होता. पात्रता फेरीत नीरज चार प्रयत्नांत चौथ्या स्थानावर राहिला, पण नंतर चांगला कमबॅक करत त्याने दुसरे, तिसरे स्थान पटकावले.

नीरज चोप्राला ब्रुसेल्स (बेल्जियम) येथे होणाऱ्या डायमंड लीगच्या अंतिम फेरीत खेळायचे आहे आणि त्यासाठी त्याला डायमंड लीगच्या चार लेग सामन्यांमध्ये चांगल्या कामगिरीच्या जोरावर गुणतालिकेत अव्वल-६मध्ये स्थान मिळवावे लागेल. डायमंड लीगचे आतापर्यंत तीन फेऱ्या झाल्या आहेत आणि नीरजने दोन फेऱ्यांमध्ये १४ गुण मिळवले आहेत. पॅरिसमध्ये आयोजित दुसऱ्या फेरीत नीरजने भाग घेतला नव्हता. आता अंतिम फेरीचा सामना ५ सप्टेंबर रोजी होणार आहे.

# बांगलादेशचा क्रिकेटपटू शाकिब अल हसनवर गुन्हा

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसन अडचणीत सापडला आहे. शाकिबवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत रुबेलचे वडील रफीकुल इस्लाम यांनी ढाका येथील अडबोर पोलीस ठाण्यात शकीबविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रुबेल हा कापड कामगार होता, ज्याचा निदर्शनादरम्यान मृत्यू झाला.

शाकिबशिवाय बांगलादेशी अभिनेता फिरदौस अहमद याच्यावरही हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इतर आरोपींमध्ये माजी पंतप्रधान शेख हसीना, ओबेदुल कादर आणि अन्य १५४ जणांचा समावेश आहे. सुमारे ४००-५०० अज्ञात लोकांनाही आरोपी करण्यात आले आहे. या सर्वांवर हत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप आहे.

५ ऑगस्ट रोजी रुबेलने एडबोरमधील रिंग रोडवरील निषेध मोर्चात भाग घेतला होता. या मोर्चादरम्यान सुनियोजित गुन्हेगारी कटाचा भाग म्हणून कोणीतरी जमावावर कथित गोळीबार केला. यात रुबेलच्या छातीत आणि पोटात गोळी लागली. यानंतर रुबेलला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र ७ ऑगस्ट रोजी त्यांचा मृत्यू झाला.

अवामी लीगच्या तिकिटावर शाकिब अल हसन आणि फिरदौस अहमद खासदार म्हणून निवडून आले होते, मात्र, शेख हसीना सरकारची सत्तेतून हकालपट्टी झाल्यामुळे या दोघांनाही खासदारकी गमवावे लागली. शाकिब सध्या पाकिस्तान दौऱ्यावर आहे, जिथे बांगलादेश संघ यजमान देशाविरुद्ध दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळत आहे.









**पनवेल** : गव्हाण गावात प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांवर कारवाई करण्यासाठी शुक्रवारी आलेल्या सिडकोच्या पथकाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत विरोध करण्यात आला. प्रकल्पग्रस्तांचा आक्रमक पवित्रा पाहून सिडकोने आपली कारवाई थांबवली.









**पनवेल** : न्हावेखाडी उत्तरपाडा येथील श्री म्हसेश्वर मंदिराचा तृतीय वर्धापन दिन शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंदिराला भेट देत म्हसेश्वराचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, शैलेश भगत, रवी नाईक, योगिता भगत, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, माजी पं. स.चे माजी सदस्य भाऊशेठ पाटील, वामनशेठ म्हात्रे, सदानंद देशमुख, सुहास भगत, कमलाकर देशमुख, योगिता भगत, निकिता खारकर, विनायक कोळी, किरण देशमुख, मनोज आंग्रे, पी.ए. कोळी, निलेश खारकर, मदन पाटील, मिनाक्षी पाटील, रंजना पाटील, सुनीता भोईर, जागृती म्हात्रे, ललीता भोईर, नरेश मोकल, चंद्रकांत भोईर, किशोर घरत, निलेश खारकर, किशोर पाटील, सुनील कोळी यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, शिवसेना रायगड जिल्हाध्यक्षपदी अतुल भगत आणि उरण विधानसभा निरीक्षकपदी रूपेश पाटील यांची निवड झाल्याबद्दल या कार्यक्रमावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले.





**पनवेल** : न्हावेखाडी उत्तरपाडा येथील श्री म्हसेश्वर मंदिराच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत आणि कोळी समाजाचे नेते विश्वनाथ कोळी यांनी मंदिरात जाऊन दर्शन घेतले.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com